दैनिक
राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक १८ । मंगळवार २७ ऑक्टोबर २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

काँग्रेसच्या अपयशामुळे खरगे वैफल्यग्रस्त



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुटुंबीयांसंदर्भात काँग्रेस पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केलेले विधान वैफल्यग्रस्त भावनेतून आहे. काँग्रेसला सर्वच स्तरावर येत असलेल्या अपयशाची ही केविलवाणी कबुली आहे. अत्यंत खालच्या स्तरावरील वक्तव्य करून त्यांनी राजकारणातील सर्व संकेत मोडीत काढले आहेत. राजकारणामध्ये काही सभ्यता, संकेत पाळायचे असतात. परंतु खरगे यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांकडून अशा पद्धतीने अनुद्गार काढणे अत्यंत दुर्दैवी आहे, अशी टीका भाजप नेते तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोमवारी नगरमध्ये पत्रकारांशी बोलताना केली.

शिवरायांचा सह्याद्री वाचवा!

- आदित्य ठाकरेंच्या ताफ्यात घुसून युवकाची आर्त हाक
- कर्जतच्या जंगलतोडीवरून संतापाचा भडका





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कर्जत : विकासाच्या नावाखाली सह्याद्रीच्या हिरव्यागार जंगलावर कुऱ्हाड चालविली जात असल्याच्या आरोपांनी रायगड जिल्ह्यातील कर्जत-भीमाशंकर परिसरातील वातावरण तापले आहे. प्रस्तावित जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याच्या निषेधार्थ स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमी आक्रमक झाले आहेत. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी साय डोंगर परिसराला भेट देत सरकारवर निशाणा साधला. दरम्यान, 'शिवरायांचा सह्याद्री वाचवा' असा फलक घेऊन एका युवकाने थेट आदित्य ठाकरे यांच्या ताफ्यात प्रवेश केल्याने जंगल वाचविण्याच्या आंदोलनाची तीव्रता अधोरेखित झाली.

गुजरातच्या टोरंट कंपनीच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी कर्जत-भीमाशंकर परिसरात हजारो झाडे तोडली जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. काही दाव्यांनुसार, या प्रकल्पामुळे सुमारे तीन लाख झाडांवर कुऱ्हाड चालण्याची भीती व्यक्त होत आहे. या वृक्षतोडीमुळे जैवविविधता, वन्यजीवांचे अधिवास आणि सह्याद्रीच्या पर्यावरणाला गंभीर धोका निर्माण होण्याची चिंता पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे.

आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करत, तुम्ही मेगावॅट म्हणताय; पण इथे मेगा वाट लावताय, असा टोला लगावला. प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक सुनावणी झाली का, नागरिकांनी नोंदविलेल्या हरकतींचे काय झाले आणि पर्यायी जागांचा विचार केला का, असे सवालही त्यांनी उपस्थित केले. **(पान ४ वर)**

मरण आले तरी मागे हटणार नाही.. : सयाजी शिंदे



अभिनेते आणि पर्यावरणप्रेमी सयाजी शिंदे यांनीही वृक्षतोडीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. सह्याद्री हे जगातील मोठे आश्चर्य आहे. पशू-पक्ष्यांच्या घरांवर बॉम्ब टाकून त्यांचा अधिवास उद्ध्वस्त करून आपण काय साध्य करतोय? टोरंट कंपनीच्या प्रकल्पासाठी कर्जत-भीमाशंकरमध्ये यापुढे एकही झाड तोडू देणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. वृक्षतोडीसाठी कोणी आले, तर हातात ताट-वाट्या घेऊन आवाज करत त्यांना विरोध करा, असे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा विनाश होऊ नये, हीच या आंदोलनामागील प्रमुख भूमिका आहे.' मरण आले तरी चालेल, जंगल वाचविण्याचा लढा थांबणार नाही'; असा आक्रमक इशारा सयाजी शिंदेही यांनी दिला आहे.

संगमनेरात १५ लाखांचा संशयास्पद धना डाळ, बडीशेप साठा जप्त

अन्न प्रशासनाचा दणका : ९.५ टन माल ताब्यात

प्रयोगशाळेच्या अहवालानंतर कठोर कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : सणासुदीच्या काळात नागरिकांच्या ताटात निकृष्ट दर्जाचे अन्नपदार्थ जाण्याचा धोका असतानाच अन्न व औषध प्रशासनाने संगमनेरात मोठी कारवाई केली आहे. 'फेस्टिव्हल ड्राईव्ह २०२६' अंतर्गत मेसर्स जगदंबा फूड प्रॉडक्ट्स या अन्न प्रक्रिया उद्योगावर धाड टाकून तब्बल १५ लाख ५६६ रुपये किमतीचा संशयास्पद धना डाळ आणि बडीशेपचा साठा जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत आणि नियमपालनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

शनिवारी (दि. २४ ऑक्टोबर) करण्यात आलेल्या या कारवाईत एकूण ९ हजार ५९६ किलो माल ताब्यात घेण्यात आला. यामध्ये ८ लाख ९९ हजार ७०० रुपये किमतीची ५ हजार ९९८ किलो धना डाळ, तर ६ लाख ८६६ रुपये किमतीच्या ३ हजार ५९८ किलो बडीशेपचा समावेश आहे. हा माल गुजरातमधील उंझा येथील 'डी. ए. पटेल' या पुरवठादाराकडून मागविण्यात आल्याची माहिती आहे.

जप्त केलेला साठा चुकीचे लेबलिंग, कमी दर्जा अथवा आरोग्यास अपायकारक असण्याच्या संशयावरून ताब्यात घेण्यात आला आहे. या मालाचे नमुने प्रयोगशाळेतील विश्लेषणासाठी पाठविण्यात आले असून, अहवालानंतर पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे या प्रकरणातील पुढील कारवाईकडे लक्ष लागले आहे.

राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे, नाशिक विभागाचे संयुक्त आयुक्त माने आणि अहिल्यानगर अन्न परिमंडळ दोनचे सहायक आयुक्त एस. एच. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी यू. आर. सूर्यवंशी व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

सणासुदीत अन्नभेसळीला लगाम घालण्याचे आव्हान

सण-उत्सवांच्या काळात अन्नपदार्थांची मागणी वाढत असताना त्यांची गुणवत्ता आणि सुरक्षितता राखणे महत्त्वाचे आहे. संशयास्पद साठ्यांवर धाडी टाकून प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला असला, तरी अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी पुरवठादारांपासून विक्रेत्यांपर्यंत संपूर्ण साखळीची तपासणी होणे गरजेचे आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

दोघा मुलांनीच केला पित्याचा खून

एकास अटक, दुसरा फरार; स्थानिक गुन्हे शाखेची २४ तासांत कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : जन्म देऊन वाढवलेल्या पित्याच्याच हत्येचा आरोप पोटच्या दोन मुलांवर आल्याने नगर तालुक्यातील वाकोडी परिसरात खळबळ उडाली आहे. सोलापूर रस्त्यावरील पाण्याच्या टाकीजवळ ४२ वर्षीय दिलीप भोसले यांचा मृतदेह आढळल्यानंतर या घटनेचे गूढ निर्माण झाले होते. मात्र, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या २४ तासांत या प्रकरणाचा उलगडा केला. या हत्येप्रकरणी अंबर दिलीप भोसले (वय १९) याला पोलिसांनी अटक केली असून, त्याचा भाऊ रोहित भोसले हा फरार आहे.

दिलीप करमदास भोसले (वय ४२, रा. वाकोडी, ता. नगर) यांचा २५ ऑक्टोबर रोजी पहाटे पाचच्या सुमारास वाकोडी येथील पाण्याच्या टाकीजवळ मृत्यू झाला. घटनेच्या दिवशी आपत्कालीन ११२ क्रमांकावर एका व्यक्तीने फोन करून पाण्याच्या टाकीजवळ खून झाल्याची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर **(पान ४ वर)**

५०० कोटींच्या कथित ऑडिओ क्लिपप्रकरणी एसआयटी स्थापन

फडणवीसांचे चौकशीचे निर्देश : अपर पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे यांच्या नेतृत्वाखाली तीन सदस्यीय तपास पथक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




मुंबई : मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहाराशी संबंधित ऑडिओ क्लिप प्रकरणाने राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या प्रकरणाची सत्यता तपासण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई पोलीस आयुक्तांना विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी तीन सदस्यीय एसआयटी स्थापन केली असून, अपर पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे यांच्याकडे तपासाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश

एसआयटीचे प्रमुख म्हणून अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई शैलेश बलकवडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोलीस उपायुक्त विजयकांत सागर आणि सायबर गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त बजरंग बनसोडे यांचा पथकात सदस्य म्हणून समावेश आहे.

२० ऑक्टोबर रोजी बीड येथे आयोजित पत्रकार परिषदेत मनोज जरांगे पाटील यांनी संबंधित ऑडिओ क्लिप ऐकवली होती. या क्लिपमध्ये एका महिलेने श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून जरांगे यांना ५०० कोटी रुपये दिल्याचा दावा केल्याचे ऐकू येत असल्याचे सांगण्यात आले. मात्र, **(पान ४ वर)**

जामखेडमध्ये 'आनंद कुशन' दुकान जळून खाक ; लाखोंचे नुकसान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

जामखेड : शहरातील व्यस्त समजल्या जाणाऱ्या नगररोडवरील शासकीय विश्रामगृहासमोर असलेल्या 'आनंद कुशन' या दुकानाला रविवारी रात्रीच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे अचानक भीषण आग लागली. या दुर्घटनेमध्ये संपूर्ण दुकान जळून खाक झाले असून, या घटनेमध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेमध्ये जीवितहानी टाळली.आगीचे स्वरूप इतके भयानक होते की बाजूच्या काही टपऱ्या व दुकानांना देखील या आगीची तीव्र झळ बसली आहे. आगीच्या प्रचंड ज्वाला आणि धुराचे लोट यामुळे संपूर्ण परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर अग्निशामक दल, पाण्याचे टँकर आणि स्थानिक नागरिकांनी केलेल्या तब्बल साडेतीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर या आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यात यश आले.

- **आग लागल्याचे लक्षात येताच उपस्थित लोकांनी तात्काळ आग विझवण्याचा प्रयत्न केला; परंतु तोपर्यंत आगीने जास्त पेट घेतला. दुकानात पडदा, कुशन आणि गाद्यांसारखे ज्वलनशील साहित्य मोठ्या प्रमाणावर असल्याने आग झपाट्याने पसरली. काही क्षणातच दुकानातून धुराचे प्रचंड लोट बाहेर पडू लागले आणि उंचच उंच ज्वाला भडकू लागल्या, यावेळी बघ्यांची गर्दी जमली आणि एकच खळबळ उडाली.**

या घटनेची सविस्तर माहिती अशी की, जामखेड शहरातील नगररोडवरील शासकीय विश्रामगृहा समोरील 'आनंद कुशन' या दुकानात रविवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास अचानक दुकान सुरू असतानाच ही आग लागली. **(पान ४ वर)**

१२ हजार शेतकऱ्यांचा मुंबईवर धडक मोर्चा!

१ हजारांहून अधिक वाहनांचा ताफा वर्षा बंगल्याच्या दिशेने; मागण्या मान्य होईपर्यंत माघार नाही

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



अकोले : दुष्काळाची झळ, थकीत आर्थिक मदत, पीकविम्याचे प्रश्न आणि प्रलंबित मागण्यांमुळे संतप्त झालेल्या शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण कष्टकऱ्यांनी सरकारविरोधात आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे. किसान सभेच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि. २६ ऑक्टोबर) अकोले ते मुंबई वाहन लाँग मार्चला सुरुवात झाली. राज्यातील २० हून अधिक जिल्ह्यांतून आलेल्या १ हजारांहून अधिक वाहनांमधून १२ हजारांपेक्षा जास्त आंदोलक मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. मुख्यमंत्री निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावर धडक देण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.

किसान सभेच्या वतीने २१ ते २६ ऑक्टोबरदरम्यान अकोले येथे महामुक्काम सत्याग्रह करण्यात आला. शेतकरी आणि ग्रामीण जनतेच्या प्रश्नांवर सरकारने चर्चा करून ठोस निर्णय घ्यावेत, अशी आंदोलकांची अपेक्षा होती. मात्र, सकारात्मक चर्चेऐवजी पोलिसांमार्फत नोटिसा बजावून वर्षा बंगल्यावर जाण्यास प्रतिबंध करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप किसान सभेने केला आहे. त्यामुळे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला.

हा लाँग मार्च सोमवारी रात्री इगतपुरीजवळील घाटणदेवी येथे मुक्कामी राहणार असून, मंगळवारी कसारा **(पान ४ वर)**

ग्रामपंचायतला टाळे ठोकल्याप्रकरणी दाम्पत्यावर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : गेल्या आठ ते दहा वर्षांपासून घरकुल जाणून बुजून रखडून ठेवले. या घटनेच्या निषेधार्थ बबन कोळपे यांनी मोमीन आखाडा ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप लाऊन त्यावर निळा झेंडा लावला. त्यानंतर राहुरी पोलीस ठाण्यात पती पत्नी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

विलास बाळासाहेब शिंदे, वय ३७ वर्षे, हे राहुरी तालुक्यातील मोमीन आखाडा येथील ग्रामपंचायत कार्यालयात शिपाई पदावर काम करतात. त्यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीत म्हटले आहे कि, दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता विलास शिंदे हे ग्रामपंचायत कार्यालयात कामकाज करत होते. तेव्हा तेथे आरोपी आले व विलास शिंदे यांना म्हणाले कि, तुमचे काम आवरुन घ्या, आम्हाला ग्रामपंचायत कार्यालयास कुलुप लावायचे आहे. तेव्हा विलास शिंदे हे त्यांचे काम करुन ग्राम पंचायत कार्यालयाचे बाहेर आले. तेव्हा **(पान ४ वर)**

उजवा कालवा पिण्याच्या पाण्यासाठी एक तर डावा कालवा शेतीसाठी दोन आवर्तन

जलसंपदामंत्र्यांचे निर्देश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : मुळा प्रकल्पाच्या उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने आणि कार्यक्षम वापर करण्यासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे सूक्ष्म नियोजन करावे. पाणी उपलब्ध करून देताना पाणीवापराचे योग्य नियोजन, वितरणातील कार्यक्षमता आणि पाण्याची बचत यांना प्राधान्य द्यावे, असे निर्देश जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

मुळा प्रकल्प कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत प्रकल्पाच्या पाणीवापराचे नियोजन आणि कालव्यांद्वारे पाणी वितरणासंदर्भातील विषयांवर चर्चा करण्यात आली.



यावेळी आमदार प्राजक्त तनपुरे, विठ्ठल लंघे, हेमंत ओगले, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर धनंजय जाधव, अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. पाण्याचे महत्त्व लक्षात घेता उपलब्ध जलसाठ्याचा योग्य विनियोग होणे आवश्यक आहे. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे. पाणी वितरण प्रक्रियेत समन्वय राखून उपलब्ध पाण्याचा योग्य उपयोग होईल, याची दक्षता घ्यावी, असेही मंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील यांनी मुळा प्रकल्प सिंचन क्षेत्र, लाभक्षेत्रातील पर्जन्यमान, सन २०२६-२७ खरीप हंगाम पाणी वापर तसेच पाण्याचे नियोजन याविषयी सादरीकरणाव्दारे सविस्तर माहिती दिली. सन २०२६-२७ रब्बी हंगामासाठी शिल्लक पाण्याचे नियोजन खालील प्रमाणे करण्यात आले आहे. मुळा उजवा **(पान ४ वर)**

शेतकऱ्याला छळाल तर तुरुंगात पाठवू

बँका, पतसंस्था, विमा कंपन्या, मायक्रो फायनान्स आणि सावकारांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा इशारा

- **शिवसेनेकडून हरसूलमध्ये १० हजार आदिवासी कुटुंबांना दिवाळीनिमित्त शिधावाटप**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



नाशिक/मुंबई : दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांकडून सक्तीची कर्जवसुली करणाऱ्या बँका, पतसंस्था, विमा कंपन्या, मायक्रो फायनान्स कंपन्या आणि खासगी सावकारांनी सावध व्हावे. शेतकऱ्यांना छळून त्यांना टोकाचे पाऊल उचलण्यास प्रवृत्त केले तर संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. शेतकऱ्यांना नडाल तर तुरुंगात पाठवल्याशिवाय राहणार नाही, असा आक्रमक इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला.

आदिवासी बहुल दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना शिवसेनेतर्फे हरसूल येथे १० हजार कुटुंबांना दिवाळी शिधावाटप करण्यात आले. यावेळी शिंदे बोलत होते.

दुष्काळामुळे उभी पिके करपली असून शेतकरी होरपळला आहे. अशा परिस्थितीत वसुलीसाठी शेतकऱ्यांच्या मागे लागणे **(पान ४ वर)**

फडणवीसांची कसोटी; सत्तेतील संघर्ष अन् जनतेचे प्रश्न !

महायुतीतील कुरघोड्या, कथित ध्वनिफितीचे राजकारण, गोळीबाराच्या घटनांमुळे ऐरणीवर आलेली कायदा-सुव्यवस्था आणि दुष्काळाच्या संकटात होरपळणारा शेतकरी अशा अनेक आघाड्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची परीक्षा सुरू आहे. राजकीय डावपेचांतून सरकारची प्रतिमा सावरण्यापेक्षा जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याला प्राधान्य देणे, हेच त्यांच्या नेतृत्वापुढील खरे आव्हान आहे.

सत्तेच्या राजकारणात आव्हाने नवी नसतात; मात्र एकाच वेळी अनेक आघाड्यांवर संघर्ष करावा लागतो, तेव्हा नेतृत्वाची खरी कसोटी लागते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या अशाच परिस्थितीतून जात आहेत. महायुतीतील मित्रपक्षांमधील मतभेद, मनोज जरांगे-पाटील यांनी समोर आणलेल्या कथित ध्वनिफितीवरून सुरू झालेले आरोप-प्रत्यारोप, राज्यातील गोळीबाराच्या घटनांमुळे उपस्थित झालेले कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या वाढत्या अस्वस्थतेने सरकारची चिंता वाढवली आहे. या परिस्थितीत फडणवीस यांच्यासमोर केवळ सरकार चालविण्याचे नव्हे, तर सरकारवरील जनतेचा विश्वास टिकविण्याचेही आव्हान उभे आहे.

महायुती सरकारमध्ये भारतीय जनता पक्ष, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे सत्तेचे भागीदार आहेत. मात्र, सत्तेतील भागीदारी म्हणजे परस्परांतील विश्वासाची हमी नव्हे, हे वारंवार स्पष्ट होत आहे. विधान परिषदेच्या उमेदवारीवरून सुरू झालेला वाद, कथित ध्वनिफितीच्या प्रकरणातील आरोप आणि अर्थखात्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसने घेतलेली भूमिका या घटनांतून सत्ताधारी पक्षांमधील अंतर्गत अस्वस्थता समोर आली आहे. एकीकडे सरकार एकजुटीचा संदेश देण्याचा प्रयत्न करते, तर दुसरीकडे मित्रपक्षांतील नेतेच एकमेकांवर संशय व्यक्त करतात. अशा वातावरणात सरकारच्या निर्णयक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

मनोज जरांगे-पाटील यांनी सादर केलेल्या कथित ध्वनिफितीने या संघर्षाला अधिक गंभीर वळण दिले आहे. मराठा आरक्षण आंदोलन कमकुवत करण्यासाठी कथितरीत्या ५०० कोटी रुपये पोहोचविल्याचा दावा या प्रकरणात केला

विशेष संपादकीय
करण नवले
(संपादक)


जात आहे. या आरोपांची सत्यता अद्याप सिद्ध झालेली नाही. त्यामुळे कोणालाही दोषी ठरविण्याची घाई करणे चुकीचे ठरेल. मात्र, आरोपांचे गांभीर्य लक्षात घेता त्यांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी न्यायवैद्यक तपासणी आणि विशेष तपास पथकाच्या चौकशीचा निर्णय घेतला असेल, तर त्यातून सत्य समोर येणे अपेक्षित आहे.

ध्वनिफितीतील आवाज कोणाचा, त्यातील संभाषण अस्सल आहे का, त्यात फेरफार झाला आहे का आणि आरोपांमागे काही ठोस पुरावे आहेत का, या प्रश्नांची उत्तरे तपासातून मिळाली पाहिजेत. ध्वनिफितीच्या वेळेवर प्रश्न उपस्थित करणे हा मुख्यमंत्र्यांचा अधिकार असला, तरी त्यामुळे तपासाच्या निष्पक्षतेबाबत शंका निर्माण होता कामा नये. चौकशीची घोषणा म्हणजे न्याय मिळाल्याची खात्री नव्हे. तपासाचा निष्कर्ष काय, दोषी आढळल्यास कारवाई कोणावर आणि निराधार आरोप करणाऱ्यांची जबाबदारी काय, हेही स्पष्ट व्हायला हवे. राजकीय सोयीपेक्षा सत्याला प्राधान्य देण्याची तयारी सरकारने दाखविली पाहिजे. दुसरीकडे, कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांनेही सरकारची चिंता वाढवली आहे. मुंबईतील गोळीबाराची घटना असो किंवा ठाण्यातील राजकीय नेत्याच्या हत्येचे प्रकरण, अशा घटनांमुळे राज्यातील सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. काही आरोपींना अल्पावधीत अटक झाली, ही पोलिसांच्या तपासातील बाब असली, तरी गुन्हा घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा तो घडू नये, यासाठी प्रतिबंधात्मक व्यवस्था प्रभावी असणे महत्त्वाचे आहे. गृहखाते मुख्यमंत्र्यांकडे असल्याने या घटनांची राजकीय जबाबदारीही त्यांच्यावर येते. विरोधकांनी सरकारवर टीका केली म्हणून मागील सरकारच्या काळातील घटनांचा दाखला देऊन प्रत्युत्तर देणे राजकीयदृष्ट्या सोयीचे असेल; पण त्यामुळे वर्तमानातील प्रश्न सुटत नाहीत. पूर्वीच्या सरकारच्या काळात चुका झाल्या असतील, तर त्यांची चौकशी व्हावी. मात्र, त्यांचा आधार घेऊन सध्याच्या सरकारला जबाबदारीपासून पळ काढता येणार नाही. कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे ही कोणत्याही सरकारची मूलभूत जबाबदारी आहे. गुन्हेगारांना राजकीय पाठबळ असल्याचा संशय निर्माण होणेही लोकशाहीसाठी घातक आहे. अशा प्रत्येक प्रकरणात निष्पक्ष तपास आणि दोषींना शिक्षा यालाच प्राधान्य मिळाले पाहिजे.

या सर्व राजकीय घडामोडींपेक्षा अधिक गंभीर प्रश्न म्हणजे राज्यावर आलेले दुष्काळाचे संकट. पावसातील तूट, पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन मदतीची घोषणा करणे आवश्यक असले, तरी प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणे त्याहून महत्त्वाचे आहे. तालुक्यांची दुष्काळग्रस्त यादी जाहीर झाल्यानंतर सत्ताधारी पक्षांतील लोकप्रतिनिधींनीच आपल्या मतदारसंघांवर अन्याय झाल्याचे आरोप करणे, ही बाब सरकारच्या निर्णयप्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.दुष्काळग्रस्त भागांची निवड वस्तुनिष्ठ निकषांवर झाली पाहिजे. राजकीय प्रभाव, मतदारसंघातील समीकरणे किंवा मंत्र्यांची नाराजी यापेक्षा पावसाची स्थिती, पिकांचे नुकसान, भूजलपातळी आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता यांना महत्त्व मिळाले पाहिजे. केंद्राकडे आर्थिक मदतीची मागणी करणे हा प्रक्रियेचा एक भाग आहे; परंतु केंद्राकडून मदत मिळेपर्यंत राज्य सरकारने हातावर हात ठेवून बसणे अपेक्षित नाही. उपलब्ध निधीचे नियोजन, चारा-पाणी व्यवस्था, पीकविमा, पीककर्ज आणि शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा यावर ठोस कृती झाली पाहिजे. पाच हजार रुपयांच्या मदतीवर शेतकऱ्यांचे संकट संपणार नाही, ही वस्तुस्थिती सरकारने स्वीकारली पाहिजे. एकीकडे मदतीच्या घोषणा आणि दुसरीकडे प्रलंबित देयके, विम्याचे प्रश्न व कर्जाचा बोजा कायम असेल, तर शेतकऱ्यांच्या असंतोषाला खतपाणी मिळणारच. किसान सभेच्या नेतृत्वाखाली सुरू झालेले आंदोलन हे या अस्वस्थतेचे निदर्शक आहे. आंदोलकांच्या मागण्यांशी सरकार सहमत असेल किंवा नसेल; मात्र त्यांच्याशी संवाद साधणे, व्यवहार्य मागण्यांवर निर्णय घेणे आणि नाकारलेल्या मागण्यांमागील कारणे स्पष्ट करणे आवश्यक आहे. आंदोलनाला केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न मानून चालणार नाही.मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमोर आज सर्वांत मोठे आव्हान महायुतीतील वाद मिटविण्याचे असले, तरी राजकारणातील प्रत्येक कुरघोडीला उत्तर देण्यातच सरकारचा वेळ खर्च होऊ नये. मित्रपक्षांतील मतभेद संवादातून सोडविता येतात; परंतु जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यास त्याची किंमत राजकीय आघाडीलाही मोजावी लागते. सत्तेतील प्रत्येक पक्षाला आपले राजकीय अस्तित्व जपायचे असते, हे मान्य; पण सरकारचे सामूहिक उत्तरदायित्व त्यापेक्षा मोठे आहे. शेवटी, मुख्यमंत्र्यांचे नेतृत्व किती प्रभावी आहे, याचा निर्णय आरोपांना दिलेल्या प्रत्युत्तरांवर किंवा राजकीय विरोधकांना नामोहरम करण्यावर होणार नाही. कथित ध्वनिफितीचे सत्य बाहेर आणणे, गुन्हेगारीला आळा घालणे, महायुतीत समन्वय राखणे आणि दुष्काळग्रस्तांच्या हातात प्रत्यक्ष मदत पोहोचविणे, या निकषांवरच त्यांच्या कारभाराचे मूल्यमापन होईल. सत्तेतील संघर्षाच्या धुरात जनतेच्या प्रश्नांचा कोंडमारा होऊ नये. कारण राजकीय वाद काही काळ गाजतात; पण शेतकऱ्याच्या शेतातील कोरडी जमीन, पाण्यासाठीची वणवण आणि सुरक्षिततेबाबतची चिंता रोज त्याच्या जगण्याला भिडत असते. ही जाणीव ठेवून सरकारने राजकारणापेक्षा प्रशासनाला आणि आरोपांपेक्षा कृतीला प्राधान्य दिले, तरच या आव्हानांच्या गर्दीतून फडणवीस सरकारला विश्वासार्हतेचा मार्ग सापडू शकेल.

फक्त खोट्या कागदी घोड्यांवर खोटे श्रेय लाटणाऱ्या विरोधकांना सागर तनपुरेंचा टोला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



राहुरी : ''ज्या विरोधकांना जनतेने गेल्या पाच वर्षांपासून त्यांची जागा दाखवत घरी बसवले आहे, त्यांनी आता तरी लोकांची दिशाभूल करणे बंद करावे. मल्हारवाडी रस्त्यासाठी कोणत्या प्रकारचा निधी मंजूर करून आणला आणि कोणत्या शासकीय आदेशावर काम सुरू झाले, हे विरोधकांनी आधी जनतेसमोर सिद्ध करून दाखवावे,'' अशा कडक शब्दांत नगरसेवक सागर तनपुरे यांनी विरोधकांचा समाचार घेत जोरदार टोला लगावला आहे.

परिसरातील अत्यंत महत्त्वाच्या मल्हारवाडी रस्त्याचे काम माजी राज्यमंत्री तथा आमदार प्राजक्तदादा तनपुरे यांच्या विशेष प्रयत्नांतून आणि नगरसेवक सागर तनपुरे व प्रियंका आहेर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून प्रत्यक्षात सुरू झाले आहे. मात्र, या प्रत्यक्ष कामाचे श्रेय लाटण्यासाठी विरोधकांकडून सुरू असलेल्या केविलवाण्या प्रयत्नांवर सागर तनपुरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सडकून टीका केली आहे.

विरोधकांच्या दाव्यांची चिरफाड करताना नगरसेवक सागर तनपुरे म्हणाले, ''विरोधकांकडे स्वतःचे कोणतेही ठोस कर्तृत्व दाखवण्यासारखे राहिलेले नाही. जनतेने त्यांना सत्तेपासून दूर ठेवून पाच वर्षे घरी बसवले आहे. आता रस्त्याचे काम प्रत्यक्षात सुरू होताच, केवळ पोकळ पत्रे दाखवून आणि लोकांची दिशाभूल करून कामाचे श्रेय लाटण्याची नौटंकी विरोधक करत आहेत. जर या कामात विरोधकांचा काही संबंध असेल, तर त्यांनी या रस्त्यासाठी नेमका कोणता निधी मंजूर करून आणला, कोणत्या योजनेतून प्रशासकीय मान्यता मिळवली, हे जाहीर करावे; अन्यथा जनतेची दिशाभूल करणे तात्काळ थांबवावे.

'' मल्हारवाडी रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिक, शेतकरी आणि वाहनचालक वर्षानुवर्षे त्रस्त होते. या समस्येचे गांभीर्य ओळखून माजी राज्यमंत्री आ. प्राजक्तदादा तनपुरे यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला. आ. तनपुरे यांनी प्रशासकीय पातळीवर विशेष लक्ष घालून आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला आणि प्रत्यक्ष कामाला गती दिली. आज रस्त्याचे काम प्रत्यक्ष जमिनीवर सुरू झाल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत असताना, विरोधक मात्र केवळ कागदी बाता मारून प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. ''राजकारण हे केवळ खोट्या प्रसिद्धीवर किंवा सोशल मीडियाच्या पोस्टवर चालत नाही, तर त्यासाठी प्रत्यक्ष जमिनीवर काम करावे लागते. जनतेला कोण काम करते आणि कोण केवळ श्रेय लाटण्यासाठी पुढे येते, हे पूर्णपणे ठाऊक आहे. त्यामुळे विरोधकांनी जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्याचे उद्योग बंद करावेत,'' असा सणसणीत इशारा सागर तनपुरे यांनी दिला. दरम्यान, मल्हारवाडी रस्त्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून, विरोधकांच्या खोट्या दाव्यांकडे दुर्लक्ष करत स्थानिक नागरिकांनी आ. प्राजक्तदादा तनपुरे आणि सागर तनपुरे यांच्या प्रत्यक्ष विकासकामांचे स्वागत केले आहे.

नगर-शिर्डी महामार्ग की 'मृत्यूचा सांगडा'?

अवजड वाहतूक तात्काळ वळवा, अन्यथा गाठ आमच्याशी : देवेंद्र लांबे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : कोल्हार ते अहिल्यानगर महामार्गावर सध्या खड्ड्यांचे आणि अर्धवट कामाचे साम्राज्य पसरले असून, दरवर्षी दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये याच रस्त्यावर अपघातांची मालिका सुरू होऊन निष्पाप दुचाकीस्वारांचे नाहक बळी जातात. तरीही प्रशासन डोळ्यांवर पट्टी बांधून गप्प बसले आहे का? असा संतप्त सवाल नगर-मनमाड रस्ता दुरुस्ती कृती समितीचे अध्यक्ष तथा शिवसेना राहुरी तालुका प्रमुख देवेंद्र एस. लांबे यांनी उठवला आहे. आगामी दिवाळीच्या काळात दुचाकीस्वारांचे प्राण वाचवण्यासाठी नगर-शिर्डी महामार्गावरील अवजड वाहतूक जानेवारी २०२७ पर्यंत तात्काळ इतर मार्गाने डायव्हर्ट करा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडू, असा थेट इशारा देवेंद्र लांबे यांनी प्रशासनाला दिला आहे.

दरवर्षी दिवाळीत निष्पाप दुचाकीस्वारांचा बळी का?आगामी काळात दिवाळी व पाडव्याच्या सुट्ट्यांमुळे शिर्डी-शनी शिंगणापूरकडे जाणाऱ्या भाविकांची गर्दी वाढणार आहे. दुसरीकडे साखर कारखान्यांच्या ऊस वाहतूक करणाऱ्या ओव्हरलोड अवजड वाहन रस्त्यावर सुरू झाली आहे. कोल्हार ते नगर टप्प्यात दररोज तासनतास होणाऱ्या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका, विद्यार्थी, नोकरदार वर्ग, प्रवाशी अडकून पडत आहेत. ''सणासुदीच्या दिवसांत दुचाकीस्वारांचे अपघात होऊन अनेक घरे उद्ध्वस्त होतात. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे हा महामार्ग प्रवाशांसाठी 'डेथ ट्रॅप' बनला आहे का?'' असा थेट हल्लाबोल देवेंद्र लांबे यांनी केला.

''रस्त्याचे काम सुरू असताना अवजड वाहनांना या मार्गावर मुभा देणे म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळण्यासारखे आहे. प्रशासनाने तात्काळ पोलीस यंत्रणेला पाचारण करून अवजड वाहतूक पर्यायी मार्गाने वळवावी. जर सणांच्या काळात एकाही दुचाकीस्वाराचा अपघाती मृत्यू झाला, तर त्याला थेट जिल्हाधिकारी व पोलीस प्रशासन जबाबदार राहील आणि त्यानंतर होणाऱ्या तीव्र जनक्षोभाची पूर्ण जबाबदारी प्रशासनाचीच असेल,'' असा आक्रमक पवित्रा देवेंद्र लांबे यांनी घेतला आहे.



पाण्याचे टँकर सुरू न झाल्याने ग्रामस्थांनी ठोकले ग्रामपंचायतीला टाळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : तालुक्यातील हदियाबाद, संजरपूर, मालुंजा खुर्द या गावात येत्या ३ दिवसांत पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरू न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला होता मात्र टँकर सुरू न झाल्याने अखेर २६ ऑक्टोबर रोजी ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयास कुलूप ठोकले.

गंगापूर तालुक्यातील हदियाबाद, संजरपूर, मालुंजा खुर्द या गावात अत्यंत भीषण टंचाई निर्माण झाली आहे.शेतवस्तीवर राहणाऱ्या नागरिक व जनावरांचे प्रचंड पाण्याअभावी हाल होत आहे. ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असून, महिला व नागरिकांचे प्रचंड हाल होत असल्याचे निवेदन ग्रामस्थांनी तहसीलदार, गटविकास अधिकारी व ग्रामपंचायतीला देण्यात आले होते परंतु या निवेदनाची प्रशासनाने कोणतीही दखल न घेतल्याने ग्रामस्थांकडून ग्रामपंचायतीस टाळे ठोकण्यात आले.यावेळी योगेश पवार आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.



दुचाकी टॅक्सी सेवेसाठी नियमांचे पालन करण्याचे नाशिक प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नाशिक : नाशिक जिल्ह्यात रोपेन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रा.लि. (रॅपिडो) व उबर मोटो कंपन्यांच्या ऑनलाइन बुकिंग ॲपच्या माध्यमातून होणाऱ्या बेकायदेशीर दुचाकी प्रवासी वाहतुकीबाबत चालकांना पुरेशी माहिती नसल्याने दुचाकी टॅक्सीचा वापर करून व्यवसाय केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने कोणत्याही दुचाकीधारक व चालकाने रोपेन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रा.लि. (रॅपिडो) व उबर मोटो कंपनीच्या बाइक टॅक्सी ॲपचा व आपल्या दुचाकीची या ॲपवर ऑनलाइन नोंदणी करू नये. नागरिकांनी नियमांचे पालन करावे आणि बेकायदेशीर दुचाकी टॅक्सी सेवांचा वापर करू नये, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रदिप शिंदे यांनी केले आहे. प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या निदर्शनास आलेल्या या प्रकारानुसार, रोपेन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रा.लि. (रॅपिडो) कंपनीविरुद्ध पंचवटी पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ६०४/२०२५ अन्वये मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम ६६, ९३, १९२-अ, १९३, १९७ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० मधील कलम ६६ (ड) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पत्रकार सुखदेव फुलारी निर्भीड पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील कांगोणी फाटा येथील संत सुडके महाराज आश्रमाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार वितरण सोहळ्यात भेंडा येथील पत्रकार जलमित्र सुखदेव फुलारी यांचा निर्भीड पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. सेवानिवृत्त न्यायाधीश वसंतराव पाटील व सिनेकलावंत बाळासाहेब शिंदे यांच्या हस्ते



शाल, प्रशस्तिपत्र व स्मृतिचिन्ह देऊन साहित्यिक व विविध सेवाकार्यात योगदान दिलेल्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.पारायण सप्ताह निमित्त काल्याचे किर्तन झाल्यानंतर आश्रमाचे प्रमुख बाळकृष्ण महाराज सुडके यांनी प्रास्ताविक भाषणात आश्रमाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या आध्यात्मिक उपक्रमांची माहिती दिली. सेवानिवृत्त न्यायाधीश वसंतराव पाटील, सिनेकलावंत बाळासाहेब शिंदे, जनार्दन महाराज मुंडे, ज्ञानेश्वर साखर कारखान्याचे संचालक अशोकराव मिसाळ, आनंदवन सेवाभावी संस्थेचे उपाध्यक्ष विनायक दरंदले उपस्थित होते. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराचे वितरण करण्यात आले.सोपानराव शिकारे यांना ग्रामिण उद्योग व्यवसाय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : वाढदिवस केवळ केक कापून साजरा न करता समाजातील गरजू घटकांसोबत आनंद वाटून घेण्याच्या उद्देशाने टायगर ग्रुपचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रेरणास्थान डॉ. पै. तानाजी भाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त लोणी येथील जिल्हा परिषद शाळेत सामाजिक उपक्रमाचे आयोजन



करण्यात आले. यावेळी शाळेतील लहान विद्यार्थ्यांच्या हस्ते केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला, तसच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसोबत आनंदाचे क्षण साजरे करण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपण्यासोबतच शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. समाजातील विविध घटकांना मदतीचा हात देणे आणि विद्यार्थ्यांच्या आनंदात सहभागी होणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता. टायगर ग्रुपचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष बंटी भिंगारदिवे यांच्या उपस्थितीत, तर टायगर ग्रुप लोणी-प्रवरा अध्यक्ष आण्णा ब्राम्हणे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम पार पडला.यावेळी प्रकाश गायकवाड, प्रदीप काळे, सैफ कुरेशी, अनिकेत खरात, अतुल पडाळे, ऋषी वाघ, संतोष बर्डे, विजू भोसले, आकाश गायकवाड, महेश खरात, मनोज भोसले, दादा जंगम, सिद्धार्थ खरात, सोनू चोखर, तुषार सिनारे, अंकुश मकावणे, मयूर वाघमारे, अजय लकारे आणि प्रतीक सोनवणे यांच्यासह टायगर ग्रुपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

कोजागिरी पौर्णिमेला नेवासा मेलडीच्या सुरांची मैफल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून नेवासा शहरातील नगरपंचायत चौकात शहर वैचारिक हिंदुत्ववादी विचारमंच आणि समर्पण फाऊंडेशनच्या वतीने आयोजित 'नेवासा मेलडी धमाकेदार' या संगीतमय कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हिंदी आणि मराठी गीतांच्या सुरेल सादरीकरणाने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले.कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी बोलताना, कोजागिरीसारख्या उत्सवांतून आणि सांस्कृतिक उपक्रमांतून सकारात्मक ऊर्जा घेऊन नेवासा शहराच्या उत्कर्षासाठी सातत्याने काम करत राहू, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या मैफलीत नेवासा मेलडीचे गायक चंद्रकांत कांदे, राजेंद्र परदेशी, सुधीर चव्हाण, अभयकुमार मोहिते, कृष्णा डहाळे, राजेश कडू, दीपक सुपेकर, सुनील गरुड, संतोष सुपेकर, प्रमोद देशपांडे, भारत कोकणे, राजेंद्र पोतदार, राजू शेख, बाळासाहेब मिटकरे आणि विशाल पवार यांनी विविध गीते सादर केली.

गरजू कुटुंबांना लवकरच 'आनंदाचा शिधा': आ. अमोल खताळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



संगमनेर : तालुक्यातील दुष्काळग्रस्त आणि गरजू कुटुंबांची दिवाळी गोड व्हावी, यासाठी लवकरच 'आनंदाचा शिधा' वाटप करण्यात येणार असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून उपलब्ध झालेला शिधा दुष्काळाची तीव्रता अधिक असलेल्या भागांतील गरजू कुटुंबांना शिवसेना कार्यकर्त्यांच्या माध्यमातून वितरित करण्यात येणार आहे. संगमनेर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेताना आमदार खताळ यांनी पिण्याचे पाणी, पशुधनासाठी चारा, रोजगार हमीची कामे, अपूर्ण पाणीपुरवठा योजना आणि शेतकऱ्यांच्या कर्जवसुलीच्या प्रश्नांवर उपाययोजना करण्याला प्राधान्य दिले जाणार असल्याचे सांगितले.

पाणीटंचाई असलेल्या गावांमध्ये मागणीनुसार तातडीने टँकर सुरू करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. आगामी काळात टंचाई वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन उपलब्ध जलसाठ्यांचे नियोजन करण्यात येत आहे. जलजीवन मिशनसह विविध पाणीपुरवठा योजनांची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळावर मात करण्यासाठी विहिरींचे खोलीकरण, नादुरुस्त पाइपलाइनची दुरुस्ती आणि स्थानिक जलस्रोतांच्या विकासावर भर देण्यात येणार आहे. तसेच रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून चारा उपलब्ध करून देणे आणि पशुधनासाठी पाणी व चाऱ्याचे नियोजन करण्यासाठी संबंधित विभागांशी समन्वय साधण्यात येत असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले.

तुळजाभवानी कमान ते डॉ. पोळ पर्यंत रस्ता करून त्यावर डांबरीकरण करण्यात यावे -दादा पा. सोनवणे मुख्याधिकारी पाटील यांना दिले निवेदन

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : राहुरी शहरातील सर्वच रस्त्यांची दुरवस्था झाली असून नुकताच शुक्लेश्वर चौक ते डॉ. पोळ यांच्या दवाखान्यापर्यंत खडी टाकलेली पासून ती अर्धवट असल्यामुळे नगर मनमाड महामार्गावर टाकलेल्या तुळजाभवानी कमानीपासून ते शुक्लेश्वर चौका पर्यंत रस्त्याची दुरावस्था झालेली असून राहुरी शहरातील सर्व व्यापारी व नागरिक यांनी राहुरी नगर परिषदेकडे निवेदनाद्रे मागणी करण्यात आली असून हा रस्ता अनेक दिवसापासून प्रलंबित असून त्याचे मत होते कारण व डांबरीकरण संबंधात वेळोवेळी चर्चा झाली असून हा रस्ता शुक्लेश्वर चौक ते डॉ. पोळ



यांच्या दवाखान्यापर्यंतच करण्याचे ठरले असून उर्वरित रस्ता नगर मनमाड महामार्गाची ठेकेदार करणार असल्याची तोंडी माहिती समजली असून राहुरीतील व्यापाऱ्यांची अशी मागणी आहे की, पूर्वी ठरलेल्या चर्चेनुसार आहे त्या वेळेत रस्ता दुरुस्त करण्यात यावा. नगर मनमाड महामार्गावरील ठेकेदार हा रस्ता करील तेव्हा करील पण शुक्लेश्वर चौक ते तुळजाभवानी कमान हा रस्ता तातडीने दुरुस्त होऊन त्यावर डांबरीकरण करण्यात यावे.

त्यामुळे होणाऱ्या धुळीचा त्रास तसेच पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होणार नसल्याने हा रस्ता तातडीने पूर्ण करण्यात यावा. अशी मागणी राहुरीतील व्यापारी व नागरिकांच्या वतीने राहुरी नगर परिषदेचे माजी विरोधी पक्ष नेते दादा पाटील सोनवणे, विरोधी गटनेते राजेंद्र ऊंडे, विरोधी पक्ष नेते अरुण साळवे, नयन शिंगी यांनी यासंदर्भातील निवेदन राहुरी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी विद्या पाटील यांना दिले असून अहिल्यानगर महामार्गावरील तुळजाभवानी कमान ते शुक्लेश्वर चौक हा रस्ता तातडीने दुरुस्त करून डांबरीकरण करण्याची विनंती करण्यात आली आहे.

बेलापूर भाजप व वीरसावरकर मित्र मंडळाकडून उर्दू शाळेत वह्या पेन वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बेलापूर : भारतीय जनता पार्टी बेलापूर व वीरसावरकर मित्र मंडळाच्या वतीने भाजप बेलापूर शहराध्यक्ष प्रफुल्ल डावरे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद उर्दू शाळा, बेलापूर येथे विद्यार्थ्यांना वह्या, पेन व खाऊचे वाटप करण्यात आले. वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.



यावेळी अभिषेक खंडागळे रणजीत श्रीगोडे, भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्ष मोहसीन सय्यद, जिल्हा कार्यकारिणी सदस्य शफीक बागवान, भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे श्रीरामपूर तालुकाध्यक्ष अजीज भाई शेख, भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष सूरज बडे, वीरसावरकर मित्र मंडळाचे आदित्य कर्डिले, भाऊसाहेब तेलोरे, केंद्रप्रमुख शकील बागवान आसिफ शेख, उर्दू शाळेच्या मुख्याध्यापिका जुलेखा सय्यद, जेबा शेख , तबस्सुम शेख , पत्रकार शफीक शेख , शहानवाज सय्यद तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

याच उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद मराठी शाळा, बेलापूर येथे शफीक बागवान मित्र मंडळ व भाजप अल्पसंख्यांक मोर्चा, श्रीरामपूर तालुका यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारा हा उपक्रम परिसरात सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Babasaheb Nawale To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: Karan Babasaheb Nawale" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

रतनगड मोहिमेतून निसर्गसंवर्धनाचा संदेश

पायरेन्स आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची अमृतेश्वर मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

लोणी : सह्याद्रीच्या निसर्गरम्य पर्वतरांगांमध्ये साहसी भटकंतीचा अनुभव घेत पायरेन्स डॉ. विखे पाटील मेमोरियल आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रतनवाडी येथील ऐतिहासिक अमृतेश्वर मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. तसेच प्रवरा नदीच्या उगमस्थळाला भेट देऊन जलसंवर्धनाचे महत्त्व जाणून घेतले. साहस, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाची सांगड घालणाऱ्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.

पायरेन्स संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, शालिनीताई विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. संस्थेचे सचिव तथा संचालक डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कल्पना साठे यांच्या सहकार्याने या मोहिमेचे आयोजन करण्यात आले. रतनवाडी येथील अमृतेश्वर मंदिर परिसरात विद्यार्थ्यांनी स्वच्छता करून पर्यटकांनी प्लास्टिकचा वापर टाळावा, कचरा योग्य ठिकाणी टाकावा आणि ऐतिहासिक वास्तूंचे पावित्र्य जपावे, असे आवाहन केले.

रतनगडाच्या डोंगरवाटांवरून मार्गक्रमण करताना विद्यार्थ्यांना शारीरिक सहनशक्ती, आत्मविश्वास, संयम आणि संघभावनेचा अनुभव



मिळाला. सह्याद्रीतील वनस्पती आणि जैवविविधतेचे निरीक्षण करत निसर्ग व मानवी आरोग्य यांच्यातील संबंधही त्यांनी जाणून घेतले. आयुर्वेदातील निसर्गपूरक जीवनशैलीचे महत्त्व या उपक्रमातून अधोरेखित झाले. प्रवरा नदीच्या उगमस्थळाला भेट देत विद्यार्थ्यांनी जलस्रोतांचे संवर्धन, पाण्याचा काटकसरीने वापर आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याची गरज समजून घेतली. ऐतिहासिक वारसा आणि निसर्गाचे जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचा संदेश या मोहिमेतून देण्यात आला.

ऊसदर जाहीर करा अन्यथा सहसंचालक कार्यालयास टाळे : संभाजी माळवदे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



नेवासा : अहिल्यानगर जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी तातडीने ऊसदर जाहीर न केल्यास अहिल्यानगर प्रादेशिक सहसंचालक कार्यालयास टाळे ठोकण्याचा इशारा काँग्रेसचे संभाजी माळवदे व शेतकरी संघटनेचे नरेंद्र काळे यांनी दिला. शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नांची दखल घेत आज काँग्रेस कमिटीचे संभाजी माळवदे व शेतकरी संघटनेचे नरेंद्र काळे यांनी शेतकऱ्यांसह अहिल्यानगर येथील प्रादेशिक सहसंचालक यांची भेट घेत ऊसदर जाहीर करण्याबाबत चर्चा केली. यावेळी अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वच कारखान्यानी साखरेचे गाळप सुरु केले आहे. परंतु एकाही कारखान्याने ऊसदर जाहीर केला नाही. ऊसदर जाहीर न केलेल्या कारखान्यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली. तसेच मागील हंगामातील एफआरपी थकीत असलेल्या कारखान्यावर देखील कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. निवेदनात अहिल्यानगर मधील साखर कारखान्यानी आठवडाभराच्या आत ऊसदर जाहीर केला नाही तर अहिल्यानगर येथील प्रादेशिक सहसंचालक कार्यालयास टाळे ठोकण्याच्या इशारा दिला. तसेच या दर जाहीर न केलेल्या साखर कारखान्याच्या गव्हानी बंद पडण्याचा इशाराही यावेळी दिला. निवेदनावेळी काँग्रेसचे संभाजी माळवदे, शेतकरी संघटनेचे नरेंद्र काळे, छावा संघटनेचे रावसाहेब काळे उपस्थित होते यावेळी प्रादेशिक उपसंचालक यांना निवेदन दिले. यावेळी साखर संचालक यांनी कारखान्याना ऊसदर जाहीर करण्याच्या नोटीसा पाठविण्यात येऊन निर्देश देण्यात येतील असे स्पष्ट केले.

द•ख•ल

श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थान येथे कोजागिरी सोहळा संपन्न



माळवाडगांव : श्रीरामपूर तालुक्याचे पूर्व परिसरात गोदावरीच्या तीरावर वसलेल्या श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थान, भामानगर येथील पवित्र तपोभूमीत रविवार २५ ऑक्टोबर २०२६ रोजी कोजागिरी पौर्णिमा दुध अमृताचा उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात अन् भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. उत्सवानिमित्त बाळकृष्ण महाराज पारखे, कुरणपूर यांचे कीर्तन झाले. या किर्तन सेवे प्रसंगी धन्य आज दिन संत दर्शनाचा,अनंत जन्मीचा शीण गेला या संत एकनाथ महाराज यांच्या अभंगवाणीतून निरूपण करताना त्यांनी सद्गुरू नारायणगिरी महाराज यांच्यासह संस्थानचे मठाधिपती अरूणनाथगिरी महाराज यांच्या अडबंगनाथ संस्थानच्या महान कार्यासह महाराजांचे कौतुक केले. संतपूजन शामराव देठे यांच्या वतीने करण्यात आले. बाबासाहेब टेमकर मेंढी, भालगाव, ता. गंगापूर यांच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. रात्री १२ वाजता भाविकांच्या उपस्थितीत दूध अमृताचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास सर्जेराव कोते शिर्डी, पोलीस उपनिरीक्षक सतीश डौले , सतीश शेळके, भाऊसाहेब काळे, सरपंच दिपाली फरगडे, प्रविण फरगडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील अधिकारी, पदाधिकारी, मान्यवर, महाराज मंडळी आणि गायनाचार्य उपस्थित होते.

श्रीरामपूर तालुका विज्ञान शिक्षक सहविचार सभा संपन्न



माळवाडगांव : अशोक इंग्लिश स्कूल प्रगतिनगर येथे ५४ वे तालुकास्तरीय विज्ञान गणित प्रदर्शन आयोजन संदर्भात पंचायत समिती शिक्षण विभाग आणि श्रीरामपूर तालुका विज्ञान गणित अध्यापक संघटना यांच्या वतीने तालुक्यातील विज्ञान शिक्षकांची सहविचार सभा संपन्न झाली. या सहविचार सभेसाठी ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सुनील दरंदले, केंद्रप्रमुख किरण कोल्हे तसेच विद्यालयाचे प्राचार्य संपतराव देसाई तालुका विज्ञान संघटनेचे अध्यक्ष शशिकांत थोरात, सचिव सूर्यकांत सराटे, तालुका गणित संघटनेचे अध्यक्ष नवनाथ साळवे, सचिव रूपाली पवार तसेच आदर्श माध्यमिक विद्यालय गोंधवणीचे मुख्याध्यापक विजय नान्नर, माध्यमिक शिक्षक सोसायटी चे संचालक साहेबराव रक्टे, विज्ञान परीक्षा प्रमुख अक्षय कदम, पं.स. विषय शिक्षक इरफान शेख आदी शिक्षक वृंद उपस्थित होते.आणि आजच्या सहविचार सभेत राज्य विज्ञान संस्था नागपूर यांचे परिपत्रकानुसार प्रदर्शनाचे विषय, गट आणि मूल्यमापन निकष हे सांगण्यात आले. तसेच नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात शाळा स्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजनाबाबतच्या सूचना देण्यात आल्या. आणि डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात होणाऱ्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या.

चारीची दुरुस्ती व झाडे झुडूपे काढण्याचे काम सुरु



पुणतांबा : रब्बी हंगामांसाठी पाटपाणी देण्यापूर्वी पाण्याचा अपव्यय होऊ नये म्हणून परिसरातील गोदावरी उजव्या कालव्याशी संलग्न असणाऱ्या चाऱ्या तसेच चर याच्यातील झाडे झुडूपे काटेरी जाळ्या काढण्याचे काम जलसंपदा खात्या मार्फत परिसरात सुरु झाले आहे परवापासून परिसरातील पुणतांबा - जळगाव शिव रसत्यावर असलेल्या गणेश बंधाऱ्या च्या दक्षिण बाजूला असलेल्या चरातील झाडेझुडपे करण्याचे काम सुरू झाले आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या सूचनेनुसार तातडीने काम सुरू असून ठेकेदार श्रीरामपूर तालुक्यातील आहे. काम सुरु असतांना चरालगत शेती असलेल्या शेतकरी वर्गाने कामाबाबद काही माहिती घेऊन शंका उपस्थित केल्या होत्या ठेकेदार व भाजपाचे जेष्ठ नेते श्री गंगाधर चौधरी यांनी कामाच्या प्रत्यक्ष ठिकाणी शेतकऱ्यांशी संवाद साधला शेतकऱ्यांचे समाधान झाल्यावर काम पुन्हा सुरु झाले.

ग्रामीण विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षणातून देशसेवेची संधी : डॉ. महेश खर्डे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



प्रवरानगर : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षणाच्या माध्यमातून देशसेवेची संधी उपलब्ध करून देण्यात प्रवरा संस्थेचे योगदान अभिमानास्पद आहे. पद्मविभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या दूरदृष्टीतून उभे राहिलेले सैनिक स्कूल विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित करणारे महत्त्वपूर्ण केंद्र ठरले आहे, असे प्रतिपादन लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सैनिक स्कूलचे कॅम्पस संचालक डॉ. महेश खर्डे यांनी केले. सैनिक स्कूलच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कर्नल सुभाष घोडगिरे, प्राचार्य राजेश माघाडे, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. खर्डे म्हणाले की, पारंपरिक शिक्षणासोबत सैनिकी शिक्षण देत प्रवरा संस्थेने शिक्षण क्षेत्रात वेगळे स्थान निर्माण केले आहे. या विद्यालयातून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी देशसेवेत कार्यरत आहेत, ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा आणि विविध कलागुणांना वाव देण्याची संधी येथे मिळते. विद्यार्थ्यांना देशसेवेसाठी सक्षम बनविण्यासाठी विद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे.

जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवरा संस्थेचे विद्यार्थी-केंद्रित उपक्रम सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. वर्धापन दिनानिमित्त विविध स्पर्धा आणि कलाप्रकारांत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे व्यवस्थापन सहशिक्षक केतन तेलोरे यांनी केले, तर सहशिक्षक ज्ञानेश्वर पाठक यांनी आभार मानले.

भजनातून मनाला ईश्वरचरणी जोडता येते स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



नेवासा : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने नेवासा तालुक्यातील देवगड येथे आयोजित तीन दिवसीय राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिराचा प्रारंभ सोमवारी देवगड संस्थानचे उत्तराधिकारी महंत स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाला. भजनामुळे मनाची एकाग्रता वाढून मानसिक स्वास्थ्य सुधारते आणि विचलित मनाला ईश्वरचरणी जोडता येते, असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार विठ्ठलराव लंघे होते. यावेळी ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे तज्ज्ञ संचालक डॉ. क्षितिज घुले पाटील, कामगार कल्याण मंडळाचे आयुक्त नंदलाल राठोड, सहायक आयुक्त भावना बच्छाव, भालचंद्र जगदाळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

आमदार लंघे म्हणाले की, भजन ही संस्कार, जनजागृती आणि भक्तिभावाची शाळा आहे. भविष्यात कामगार कल्याण मंडळाच्या भजन स्पर्धा देवगड येथे आयोजित कराव्यात, अशी सूचनाही त्यांनी केली. डॉ. क्षितिज घुले पाटील यांनी श्रमिक हे समाजाच्या प्रगतीचा आधार असून, कामगारांच्या कल्याणासाठी ज्ञानेश्वर उद्योग समूह प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

आयुक्त नंदलाल राठोड यांनी कामगारांना संतपरंपरा, भजन, कीर्तन आणि भक्तीविषयक ज्ञान मिळावे, या उद्देशाने शिबिराचे आयोजन केल्याचे सांगितले. या तीन दिवसीय निवासी शिबिरात राज्यभरातील २०० हून अधिक कामगार सहभागी झाले आहेत. कल्याण निरीक्षक महेश विभांडिक यांनी सूत्रसंचालन केले, तर सहायक आयुक्त भावना बच्छाव यांनी आभार मानले.

शनि दर्शनाने मन प्रसन्न होते ; पुढील कामासाठी ऊर्जा मिळते आ. अक्षय कर्डिले शनिचरणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



सोनई : जगाची न्यायदेवता म्हणून ओळखले जाणारे शनिदेव प्रत्येकाला त्याच्या कर्मानुसार न्याय देतात. शनिशिंगणापूर येथे येऊन शनिदेवाचे दर्शन घेतल्याने मन प्रसन्न झाले असून, आगामी काळात जनसेवेची आणि विकासकामांची जबाबदारी पार पाडण्यासाठी नवी ऊर्जा प्राप्त होते असे प्रतिपादन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे स्व. माजी अध्यक्ष शिवाजीराव कर्डीले यांचे सुपुत्र नवनिर्वाचित संचालक तथा आमदार अक्षयदादा कर्डिले यांनी केल. आमदार अक्षय कर्डिले यांनी शनिशिंगणापूर येथे भेट देऊन शनिदेवाचे दर्शन घेतले. दर्शनानंतर शनिशिंगणापूर देवस्थानच्या अतिथिगृहात त्यांचा सत्कार राज्यपाल पुरस्कारप्राप्त शनिशिंगणापूरचे पोलीस पाटील ड. सयाराम पाटील बानकर यांनी सन्मान केला. यावेळी उद्योजक राजेश सोनवणे, डॉ. बोरुडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार कर्डिले यांनी शनिशिंगणापूरच्या विकासाचा आणि येथील धार्मिक महत्त्वाचा उल्लेख केला. स्वर्गीय बानकर भाऊ यांनी अथक परिश्रमातून शनिशिंगणापूरच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान दिले. त्यांच्या प्रयत्नांमुळे या तीर्थक्षेत्राची ओळख जगभर पोहोचली. परिणामी, या परिसरातील तरुणांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होण्यास मदत झाली, असे त्यांनी नमूद केले. !स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले हे कोणत्याही महत्त्वाच्या कामाची सुरुवात करण्यापूर्वी शनिदेवाचे दर्शन घेत असत. त्यांची ही श्रद्धा आणि परंपरा आपणही पुढे सुरू ठेवणार आहोत, असे आमदार अक्षय कर्डिले यांनी सांगितले. शनिदेवाच्या दर्शनातून मिळणारी सकारात्मक ऊर्जा जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आणि विकासकामांना गती देण्यासाठी प्रेरणादायी ठरते, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. आमदार कर्डिले यांच्या शनिशिंगणापूर भेटीदरम्यान झालेल्या या सत्कारामुळे धार्मिक श्रद्धा, सामाजिक योगदान आणि विकासाच्या कार्याचा संगम पाहायला मिळाला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा हटविल्याच्या निषेधार्थ

नेवासा फाटा येथे दिड तास रस्ता रोको!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



नेवासा : तालुक्यातील तेलकुडगाव येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा प्रशासनाने पोलीस बंदोबस्तात अनधिकृतपणे काढून नेल्याच्या घटने विरोधात जिल्हाभरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून या घटनेच्या निषेधार्थ सोमवार (दि.२६) रोजी दुपारी १२ वाजता नगर - छत्रपती संभाजीनगर महामार्गवरील नेवासे फाटा येथील राजमुद्रा चौक ते डॉ. आंबेडकर चौकात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा बचाव कृती समितीच्यावतीने सुमारे दिड तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

यावेळी बोलतांना रिपाईचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात म्हणाले की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार असून त्यांच्या पुतळ्याशी जनतेच्या भावना जोडलेल्या आहेत. प्रशासनाने काही दिवसांतच पुतळा आहे त्याच ठिकाणी सन्मानपूर्वक बसवला नाही तर लोकशाही व शांततामय मार्गाने होणाऱ्या तीव्र आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी शासन-प्रशासनाची राहील,असा धडक इशारा देत ते म्हणाले की, पुतळ्याच्या सुरक्षेचा प्रश्न हा अस्मितेचा प्रश्न आहे. प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले तर हा लढा रस्त्यापासून मंत्रालयापर्यंत नेऊ, असा इशारा त्यांनी यावेळी बोलतांना दिला.

या आंदोलनाचे नेतृत्व रिपाईचे तालुकाध्यक्ष सुशील धायजे,वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष पोपटराव सरोदे, रिपाईचे शहराध्यक्ष पप्पू इंगळे यांनी केले यावेळी वंचित बहुजन आघाडीचे राज्य नेते प्रा.किसन चव्हाण म्हणाले की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा कोणत्या आदेशाने व कोणाच्या परवानगीने हटवला गेला याचा खुलासा प्रशासनाच्यावतीने करण्यात यावा तसेच आमच्या शांततेचा आणि सहनशीलतेचा अंत आता पाहू नये प्रशासनाने याची वेळीच दखल घेवून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे 'त्या' जागी पुन्हा बसवीला नाहीतर आम्ही स्वतः तेलकुडगावात येथे जाऊन महामानवाचा पुतळा बसविणार असून मंग होणाऱ्या परिणामास शासन आणि प्रशासन जबाबदार राहणार असल्याचा निर्वाणीचा इशाराही यावेळी बोलतांना स्पष्ट शब्दात दिला.

यावेळी अँड.संजय सुखधान,आर पी आयचे तालुकाध्यक्ष सुशील धायजे,शहराध्यक्ष पप्पू इंगळे, वंचितचे तालुकाध्यक्ष पोपट सरोदे,दयानंद खिल्लारे, विजय गायकवाड,स्वप्निल सोनकांबळे आदी मान्यवरांची भाषणे झाली यावेळी आंदोलकांचे निवेदन उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील आणि उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांनी स्वीकारले या आंदोलनास मोठ्या संख्येने भीमसैनिक,महिला भगिनी, युवक-युवती अउपस्थित होत्या. यावेळी नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे,सहायक पोलीस निरीक्षक अमोल पवार,उपनिरीक्षक विकास पाटील,सहायक फौजदार गणेश नागरगोजे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी कडक बंदोबस्त करत रस्ता रोको झाल्यानंतर वाहतुकीस महामार्ग सुरळीत केला.

निळ्या टोप्या घातलेले शेकडो रिपाईचे महिला - पुरुष आणि भीमसैनिक थेट रस्त्यावर उतरले डॉ.बाबासाहेबांच्या पुतळ्याला धक्का लागला तर गाठ आमच्याशी आहे,अशा कडक आणि शब्दात त्यांनी थेट प्रशासनालाच यावेळी इशारा देवून आपला संताप व्यक्त केला.

राहुरीतील वाहतूक कोंडीचा प्रश्न दोन दिवसांत मार्गी लावणार

डॉ. सुजय विखे पाटील यांची ग्वाही

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



राहुरी : अहिल्यानगर-मनमाड महामार्गावर राहुरी शहर ते नांदगाव शिंगवे दरम्यान गेल्या तीन दिवसांपासून निर्माण झालेल्या भीषण वाहतूक कोंडीची माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी वाहतूक कोंडीची कारणे जाणून घेत प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या. येत्या दोन दिवसांत प्रशासन आणि संबंधित ठेकेदार यांची बैठक घेऊन वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

नगर-मनमाड महामार्गावर गेल्या तीन दिवसांपासून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून, वाहनचालकांसह प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. राहुरी शहर ते नांदगाव शिंगवे तसेच चिंचोली फाटा ते कोल्हारदरम्यान वाहतुकीचा खोळंबा होत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यावरील वाहनांची संख्या वाढली असून, वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांचा वेळ वाया जात आहे. या पार्श्वभूमीवर माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी राहुरी फॅक्टरी येथे थांबून परिस्थितीची पाहणी केली. वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्याशी चर्चा करून वाहतूक व्यवस्थापनाबाबत आवश्यक त्या सूचना केल्या.दरम्यान, सकाळपासूनच डॉ. सुजय विखे पाटील यांचे सहकारी आणि पोलीस प्रशासन वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रयत्नशील होते. वाहनांची ये-जा सुरळीत व्हावी आणि प्रवाशांना दिलासा मिळावा, यासाठी वाहतूक नियंत्रित करण्याचे प्रयत्न करण्यात आले.

मात्र, वारंवार निर्माण होणाऱ्या या वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज व्यक्त होत आहे. यासाठी येत्या दोन दिवसांत प्रशासन आणि संबंधित ठेकेदार यांची बैठक घेऊन उपाययोजनांबाबत निर्णय घेण्यात येईल, असे डॉ. सुजय विखे पाटील यांनी स्पष्ट केले. गेल्या काही दिवसांपासून वाहतूक कोंडीने त्रस्त झालेल्या वाहनचालक आणि प्रवाशांचे लक्ष आता प्रशासनाच्या पुढील कार्यवाहीकडे लागले आहे.

जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मी रेखा गंगाधर हजारे, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. खांडगाव, संगमनेर, जि. अहिल्यानगर, येथील रहिवासी असून माझे पती नामे कै. गंगाधर सावळेराम हजारे हे दिनांक ०८/०४/२०२६ रोजी मयत झाले आहेत. त्यांच्या नावे टाटा मोटर्स कंपनीची खालील चार वाहने नोंद आहेत.

१. टाटा मोटर्स कंपनीचा ट्रक, मॉडेल २०२३, रजिस्ट्रेशन नं. MH-17-CV-2105, चेसिस नं. MAT830004P8J15636.

२. टाटा मोटर्स कंपनीचा टिप्पर, मॉडेल २०२१, रजिस्ट्रेशन नं. MH-17-BY-7638, चेसिस नं. MAT786002M8H10717.

३. टाटा मोटर्स कंपनीचा टिप्पर, मॉडेल २०२२, रजिस्ट्रेशन नं. MH-17-CV-0530, चेसिस नं. MAT804302N8B03366.

४. टाटा मोटर्स कंपनीचा टिप्पर, मॉडेल २०२१, रजिस्ट्रेशन नं. MH-17-CV-6988, चेसिस नं. MAT830004P8E07052.

मयत गंगाधर सावळेराम हजारे यांच्या पश्चात मी त्यांची पत्नी व कायदेशीर वारस असून, सदर चारही वाहने माझ्या (रेखा गंगाधर हजारे) नावे हस्तांतरित करण्यासाठी आवश्यक अर्ज व कागदपत्रे संबंधित आर.टी.ओ. कार्यालयात दाखल करावयाची आहेत. तरी मयत गंगाधर सावळेराम हजारे यांच्या नावे असलेली वरील नमूद चारही वाहने माझ्या नावे हस्तांतरित करण्याबाबत कोणाचीही काही हरकत, अधिकार, हक्क अथवा दावा असल्यास, संबंधितांनी आपली हरकत किंवा तक्रार योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह संबंधित आर.टी.ओ. कार्यालयात अथवा खालील पत्त्यावर जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात सादर करावी. पत्ताः रेखा गंगाधर हजारे, रा. खांडगाव, संगमनेर, जि. अहिल्यानगर. सदर मुदतीत कोणाचीही लेखी हरकत किंवा तक्रार प्राप्त न झाल्यास, कोणाचीही हरकत नसल्याचे गृहीत धरून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

नोटीस प्रसिद्धीची तारीखः २६/१०/२०२६

श्रीमती रेखा गंगाधर हजारे

वारसा बाबतचे जाहीर प्रगटन

सर्व जनता मौजे-**बेलवंडी बु**.तालुका-**श्रीगोंदा**, जिल्हा **अहिल्यानगर** याद्वारे सूचित करण्यात येते कि, **कै. जिजाबाई तुळशिराम काशिद** ह्या दिनांक १७/०७/२०२४ रोजी मयत झाल्या असून त्यांच्या नावे मौजे बेलवंडी बु.ता- श्रीगोंदा येथे शेत जमीन ग.न. १०७२ क्षेत्र १ हे १८ आर क्षेत्र असून सदर जमिनीचा वारस नोंदीचा फेरफार करण्यासाठी मयताच्या वारसा पैकी त्यांचे वारस श्री. मंगेश विलास काशिद यांनी वारस नोंदीसाठी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे. अर्जात पुढील प्रमाणे वारस दर्शविण्यात आलेआहेत.

अ.क्र	वारसाचे नाव	वय	मृत खातेदाराशी नाते	शेरा
१	विलास तुळशिराम काशिद (मयत)	मयत	मुलगा	
	१. आकाश विलास काशिद	४३ वर्ष	नातू	
	२. मंगेश विलास काशिद	३६ वर्ष	नातू	
	३. विद्या संतोष रंधवे	३७ वर्ष	नात	
	४. श्रीम. आशा विलास काशिद	६१ वर्ष	सुन	

वरील वारसाबाबत कोणास काही आक्षेप/हरकत असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखीस्वरूपात सादर करावेत. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा/हरकतीचा विचार केला जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ग्राम महसूल अधिकारी
बेलवंडी बु.
ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर
दिनांक :- २३/०६/२०२६

पान १ वरुन

जामखेडमध्ये 'आनंद कुशन' दुकान जळून खाक ; लाखोंचे नुकसान

या घटनेची माहिती मिळताच परिसरातील व्यावसायिक, तरुण आणि नागरिक मदतीसाठी तातडीने घटनास्थळी धावून आले. सर्वांनी मिळून आग विझवण्यासाठी मोठी धावपळ सुरू केली. जामखेड नगरपरिषदेचा अग्निशामक बंब तात्काळ घटनास्थळी दाखल झाला; परंतु आग खूप मोठ्या प्रमाणावर असल्याने तो अग्निशामक बंब या भयंकर आगीपुढे तोडका पडला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक लोकांच्या मदतीने तातडीने पाण्याचे अनेक टँकर घटनास्थळी बोलावण्यात आले. तसेच आग अधिक पसरू नये म्हणून आष्टी येथून देखील आष्टी नगरपंचायतीचा अग्निशामक बंब मागविण्यात आला. आगीची तीव्रता अधिक असल्याने आणि धुराचे साम्राज्य पसरल्याने आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशामक दलाच्या जवानांना व नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अखेर सर्व यंत्रणांच्या संयुक्त प्रयत्नांनंतर तब्बल साडेतीन तासांच्या थरारानंतर ही भीषण आग आटोक्यात आणण्यात यश आले. या भीषण आगीची माहिती सम जताच घटनास्थळी नागरिकांनी आणि वाहनचालकांनी गर्दी केली होती. सुरक्षेचा मोठा उपाय म्हणून आणि कोणतीही मोठी जीवितहानी किंवा अनर्थ टाळण्यासाठी प्रशासनाच्या वतीने काही काळ संबंधित परिसरातील वीज पुरवठा पूर्णपणे खंडित करण्यात आला होता. या दुर्घटनेमुळे जामखेडमधील व्यापारी वर्गात तीव्र चिंतेचे आणि भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, ही आग नेमकी कशामुळे लागली (शॉर्ट सर्किट व्यतिरिक्त इतर काही कारण आहे का) आणि या दुर्घटनेम ध्ये दुकानाचे नेमके किती लाखांचे आर्थिक नुकसान झाले. याबाबत कोणतीही अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. पोलीस व प्रशासकीय यंत्रणेकडून या घटनेचा पुढील शोध घेतला जात आहे.

.ग्रामपंचायतला टाळे ठोकल्याप्रकरणी दाम्पत्यावर गुन्हा दाखल

आरोपींनी ग्रामपंचायत कार्यालयाचे बाहेरील गेट बंद करुन गेटला कुलुप लाऊन त्यावर निळ्या रंगाचा झेंडा लावला. दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता पंचायत समितीचे विस्तार अधिकारी ग्रामसेवक, सरपंच, माजी सरपंच, पोलीस पाटील व इतर ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयात येऊन आरोपींना ग्रामपंचायत कार्यालयाला लावलेले कुलुप व निळा झेंडा काढण्यास सांगीतले. परंतु आरोपींनी कोणाचेही काही एक ऐकले नाही. ग्रामपंचायत कार्यालयातुन गावातील मुलांना, तसेच नागरीकांना लागणारे दाखले तसेच इतर कागदपत्रे देण्यास तसेच दैनंदिन कामकाज करणेकरीता अडथळा निर्माण करुन ग्रामपंचायत कार्यालयात जाण्यास अटकाव करुन ग्रामपंचायत या सरकारी कार्यालयास कुलुप लावुन सरकारी (पान ४ वर)कामात अडथळा आणला. म्हणून आरोपी बबन तुळशिराम कोळपे, मंगलबाई बबन कोळपे, दोघे रा. मोमीन आखाडा, ता. राहुरी, या पती पत्नीवर गुन्हा रजि. नं. ११९२/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १२६(२), २२१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

उजवा कालवा पिण्याच्या पाण्यासाठी एक तर डावा कालवा शेतीसाठी दोन आवर्तन

कालवा बंधाऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी-जानेवारी २०२७ ते मार्च २०२७ - आवर्तन १ वेळा तर मुळा डावा कालवा जानेवारी २०२७ ते मार्च २०२७ दोन वेळेस आवर्तन देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

शेतकऱ्याला छळाल तर तुरुंगात पाठवू

खपवून घेतले जाणार नाही. शेतकऱ्याने आत्महत्या केली तर त्याम ागे दबाव आणणाऱ्यांची भूमिका तपासली जाईल. शेतकऱ्यांनीही कोणतेही टोकाचे पाऊल न उचलता आपल्या अडचणी या शिवसेनेच्या कार्यकर्ते, प्रशासन आणि सरकारला सांगाव्यात, असे आवाहन त्यांनी केले. राज्यातील ३०५ तालुके दुष्काळग्रस्त असून दुष्काळातील सर्व सवलती व लाभ पात्र शेतकऱ्यांना मिळतील. तातडीची ५ हजार रुपयांची मदत जाहीर झाली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी दुष्काळाबाबत चर्चा झाली असून केंद्र व राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे शिंदे यांनी सांगितले. प्रत्येक दुष्काळग्रस्त भागात 'शेतकरी मदत कक्ष' सुरू करून पंचनामे, अर्ज, नुकसानभरपाई, पाणी, टँकर आणि सरकारी मदत वेळेवर मिळते की नाही, याची जबाबदारी शिवसैनिकांनी घ्यावी. आता दुसरे काम नको; बांधावर, शेतावर आणि शेतकऱ्यांच्या घरी जा, असे निर्देश त्यांनी दिले. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीतील केंद्राच्या ६ हजार रुपयांसोबत राज्याचे ६ हजार रुपये देऊन १२ हजारांची वार्षिक म दत, लाडकी बहीण योजना, मुलींचे मोफत उच्च शिक्षण, एसटीमध्ये ५० टक्के सवलत, एनडीआरएफची मदत वाढवणे, दोनऐवजी तीन हेक्टरपर्यंत नुकसानभरपाई तसेच सततचा पाऊस आणि गोगलगायीच्या नुकसानीची भरपाई अशा निर्णयांचा त्यांनी उल्लेख केला. दुष्काळ दीर्घकाळ राहण्याची शक्यता लक्षात घेऊन पाणी, चारा व अन्नधान्याचे नियोजन, छोटे-मोठे पाणी प्रकल्प, पर्यटनातून रोजगार, गरजू गावांना टँकर आणि दुष्काळामुळे रखडलेल्या विवाहांसाठी शिवसेनेतर्फे साम ुदायिक विवाह सोहळा आयोजित केला जाईल. ग्रामीण मुलींसाठी २५ हजार सायकलींच्या वाटपाचाही उपक्रम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. मागील वर्षी अतिवृष्टीत जमीन खरडून जाणे, गुरे वाहून जाणे आणि घरांची पडझड झाल्यानंतर सरकारने मदत केली. यंदाही दिवाळी काळी होऊ नये म्हणून शिधावाटप करण्यात आला. जिथे संकट, तिथे शिवसेना या भूमिकेतून पूर, महापूर किंवा दुष्काळात शिवसैनिकांनी मदतीला धावून जावे. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांनी प्रेरित शिवसैनिकांनी ८० टक्के समाजकारणाचे धोरण आता १०० टक्के समाजकारणातून प्रत्यक्षात आणावे, असे आवाहन शिंदे यांनी केले. वाहन पोहोचत नसलेल्या गावांमध्येही मदत पोहोचवावी आणि पक्षभेद बाजूला ठेवून सर्वांनी दुष्काळग्रस्तांच्या मदतीला यावे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे, नाशिकचे उपमहापौर विलास शिंदे, माजी आमदार निर्मला गावित, धनराज म हाले, बाळासाहेब लांबे, अनिल डिकले, सदा नवले, रविंद्र भोळे, नैना गावित यांच्यासह शिवसेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

५०० कोटींच्या कथित ऑडिओ क्लिपप्रकरणी एसआयटी स्थापन

या दाव्यांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही.

आपल्याला आणि मराठा आरक्षण आंदोलनाला बदनाम करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप जरांगे यांनी केला होता. कथित कटाचा पर्दाफाश करण्यासाठी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे चौकशीची मागणी केली होती. ऑडिओ क्लिप समोर आल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी तिची फॉरेन्सिक तपासणी करण्यात येईल,असे स्पष्ट केले होते. आता स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीकडून क्लिपची तांत्रिक पडताळणी, फॉरेन्सिक विश्लेषण आणि संपूर्ण प्रकरणाचा तपास केला जाणार आहे. त्यामुळे क्लिपमधील आवाज, संभाषणाची सत्यता आणि त्यामागील पार्श्वभूमी तपासाच्या केंद्रस्थानी राहणार आहे. तपासाची व्याप्ती लक्षात घेऊन एसआयटी प्रमुखांना आवश्यकतेनुसार अन्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. तसेच तपासाच्या प्रगतीचा अहवाल वेळोवेळी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयाला सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दोघा मुलांनीच केला पित्याचा खून

भिंगार कॅम्प पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तेथे दिलीप भोसले हे कानातून रक्त येत असलेल्या अवस्थेत जमिनीवर बेशुद्ध पडलेले आढळले. पोलिसांनी त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केले. या घटनेनंतर सुरुवातीला अज्ञात आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. भिंगार कॅम्प पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेनेही समांतर तपास सुरू केला. पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक हरीश भोये व त्यांच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. त्याचा शोध सुरू आहे. पित्याच्या हत्येमागील नेमके कारण काय, याचा तपास भिंगार कॅम्प पोलीस करीत आहेत. पोटच्या मुलांवरच पित्याच्या हत्येचा आरोप झाल्याने या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अवघ्या २४ तासांत या गुन्ह्याचा उलगडा करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असले, तरी हत्येमागील कारण आणि फरार संशयिताच्या शोधाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

कोपरगावकरांच्या प्रतिसादाने 'दिवाळी हाट'मध्ये विक्रेत्यांच्या चेहऱ्यावर समाधान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : दिवाळीच्या सणानिमित्त नागरिकांना आवश्यक वस्तूंची खरेदी एकाच ठिकाणी करता यावी, तसेच स्थानिक छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी या उद्देशाने कोपरगाव येथील कृष्णाई मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या 'दिवाळी हाट'ला कोपरगावकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विविध वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावल्याने 'दिवाळी हाट' मध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्राहकांच्या वाढत्या प्रतिसादामुळे विक्रेत्यांची मोठ्या प्रमाणात विक्री होत असून, त्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून येत आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आकर्षक वस्तू, सजावटीचे साहित्य, आकाशकंदील, पणत्या, फराळाचे पदार्थ, कपडे तसेच विविध दैनंदिन गरजेच्या वस्तूंनी 'दिवाळी हाट' सजला आहे. एकाच ठिकाणी विविध वस्तू खरेदी करण्याची सुविधा मिळत असल्याने नागरिकांकडून या उपक्रमाला पसंती दिली जात आहे. स्थानिक व्यावसायिकांना आपल्या वस्तू थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या व्यवसायालाही चालना मिळत आहे. 'दिवाळी हाट'ला नागरिकांनी आवर्जून भेट



देत स्थानिक व्यावसायिक आणि महिला बचत गटांच्या उत्पादनांची खरेदी करून त्यांना प्रोत्साहन दिले, ही आनंदाची बाब आहे. या उपक्रमामुळे स्थानिक व्यावसायिकांना विक्रीसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले असून महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळण्यास मदत होत आहे. नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे विविध वस्तूंची मोठ्या प्रमाणात विक्री होत असून विक्रेत्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान व सर्व वस्तू माफक दरात मिळत असल्याने ग्राहकाच्या चेहऱ्यावरचा आनंद हे या 'दिवाळी हाट'चे यश आहे. स्थानिक व्यावसायिक आणि महिलांच्या कष्टातून तयार झालेल्या उत्पादनांना प्राधान्य दिल्यास त्यांच्या आर्थिक उन्नतीला हातभार लागेल. दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासोबतच स्थानिक व्यवसायाला चालना देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांनी दिलेला प्रतिसाद निश्चितच प्रोत्साहन देणारा आहे. भविष्यातही नागरिकांनी स्थानिक उत्पादनांच्या खरेदीला प्राधान्य देऊन व्यावसायिक आणि महिला बचत गटांना सहकार्य करावे अशी अपेक्षा प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळाच्या अध्यक्षा तथा गौतम सहकारी बँकेच्या माजी संचालिका पुष्पाताई काळे यांनी केले आहे.

नेवासा बाजार समितीला १ कोटी ५९ लाखांचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्यात येणार आहे. माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या प्रयत्नाने १ कोटी ५९ लाख रुपये खर्चाच्या या बांधकामाला महाराष्ट्र शासनाच्या पणन विभागाने मान्यता दिली आहे.

नेवासा बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी तालुक्यासह परिसरातील विविध गावांमधून शेतकरी येत असतात. अनेकदा शेतमाल विक्रीसाठी प्रतीक्षा करावी लागते. अशा वेळी शेतकऱ्यांना निवासाची सुविधा उपलब्ध नसल्याने गैरसोयीचा सामना करावा लागतो. ही अडचण दूर करण्यासाठी शेतकरी भवन उभारण्याचा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या बांधकामासाठी शासनाकडून ५० टक्के अनुदान देण्यात येणार असून उर्वरित ५० टक्के खर्च बाजार समिती करणार आहे. प्रस्तावित शेतकरी भवनाची इमारत दुमजली असणार आहे. या भवनामुळे बाजार समितीत येणाऱ्या शेतकऱ्यांना निवासाची सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

शेतकऱ्यांच्या सोयी-सुविधांच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात असून,शेतकरी भवनाच्या मंजुरीमुळे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.माजी गडाख साहेब यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे शेतकऱ्यांची चांगली सोय होणार असल्याने नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील व संचालक मंडळासह परिसरातील शेतकऱ्यांनी माजी मंत्री शंकरराव गडाख यांना धन्यवाद देत शेतकरी भवन मंजूर करून आणल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे.

रा. स्व. संघाच्या पथसंचलन व विजयादशमी उत्सवात

चांदा : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, चांदा उपखंडाचा विजयादशमी उत्सव व पथसंचलन छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, चांदा बाजारतळ येथे उत्साहात पार पडला. शस्त्रपूजन व त्यानंतर घोष पथकासह निघालेल्या शिस्तबद्ध पथसंचलनाने कार्यक्रमाची शोभा वाढवली. पथसंचलनाच्या संपूर्ण मार्गात हिंदू माता-भगिनींनी घरासमोर सडा-सम्मार्जन करून सुंदर रांगोळ्या काढल्या होत्या. तसेच पथसंचलनावर ठिकठिकाणी महिला भगिनींनी फुलांचा वर्षाव करून स्वयंसेवकांचे स्वागत केले. यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि उत्साही बनले होते.यावेळी प्रमुख वक्ते वैद्य प्रणव वसंतराव जोशी आणि प्रमुख पाहुणे शरद सदाशिव गाडेकर यांनी मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात प्रमुख वक्त्यांनी दोन महत्वाचे विषय मांडले. इतिहासातील आक्रमणांचा उल्लेख इतिहासात हिंदू समाजावर आणि भारतावर मोघल आक्रमकांनी केलेल्या आक्रमणांमुळे आपल्या संस्कृती, मंदिरे आणि सामाजिक व्यवस्थेवर कसा आघात झाला.


निधनवार्ता

अथर्व काळे



राहुरी : राहुरी शहरा जवळील काळे आखाडा येथील अथर्व सचिन काळे उर्फ छोटू (वय १८ वर्षे) याचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्याच्या पश्चात तीन बंधू, आई-वडील, चुलते, आजोबा, आजी असा परिवार आहे. राहुरी येथील जोगेश्वरी सोसायटीचे संचालक राजेंद्र काळे यांचा तो पुतण्या तर सचिन काळे यांचा मुलगा होत.

अशोक गांधी



श्रीरामपूर : येथील जेष्ठ आडत व्यापारी अशोक चंदनमल गांधी (वय ८२) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, सुना, बहिणी, जावई व नातू असा परिवार आहे. सत्यम ऑटोमोबाईचे गिरीष व सुविध गांधी यांचे वडील तर नेवाशाचे पत्रकार विजय गांधी व श्रीरामपूरचे सामाजिक कार्यकर्ते अरूण गांधी व ॲड. शशिकांत गांधी यांचे ते चुलत बंधु होते.

कृष्णाबाई विद्वांस



माळवाडगांव : श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगांव येथील कृष्णाबाई विद्वांस महानुभाव (वय ७४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. कृष्णाबाई यांनी महानुभाव संप्रदायाची दिक्षा घेतल्यानंतर संप्रदायाचे सेवेत आयुष्य समर्पित केले. महंत गुंफेकर बाबा यांच्या चक्रपाणी आश्रमात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. माळवाडगांव येथील प्रगतशील शेतकरी बाळासाहेब ,व विजय दत्तात्रय आदिक यांच्या त्या भगिनी होत.

CHANGE OF NAME

I, Ayyaz Farque Shaikh, resident of Nevasa, hereby declare that I have changed my name to Ayaj Faruk Pinjari.Henceforth, I shall be known and identified as Ayaj Faruk Pinjari for all official, legal, banking, educational, passport and other purposes.

इस्त्रो सहलीसाठी हर्षदा भिसेची निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

चांदा : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खोसपुरी येथील इयत्ता सातवीत शिकणारी विद्यार्थिनी हर्षदा देविदास भिसे हिची जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या इस्रो परीक्षेतील उल्लेखनीय यशाच्या जोरावर इस्रो (खडठज) सहलीसाठी निवड झाली आहे.

शेतकरी कुटुंबातील विद्यार्थिनी असलेल्या हर्षदाने अत्यंत खडतर आणि प्रतिकूल परिस्थितीत जिद्द, मेहनत व चिकाटीच्या बळावर हे यश संपादन केले. या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खोसपुरी आणि समस्त ग्रामस्थ, खोसपुरी यांच्या वतीने हर्षदा भिसे तसेच तिच्या आई-वडिलांचा सन्मान करण्यात आला.

याच कार्यक्रमात जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित स्पेलिंग बी स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविण्याचा मान मिळवलेल्या श्रावणी भिसे हिचाही सन्मान करण्यात आला. तसेच शिक्षक राहुल लोंढे यांची घोडेगाव बीट विस्तार अधिकारी म्हणून पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.ग्रामपंचायतीमार्फत हर्षदा आणि श्रावणी या दोन्ही विद्यार्थिनींना प्रत्येकी एक हजार रुपये देण्यात आले.

२०२ रुपयांत प्रीपेड रिचार्ज ३२ दिवसांची व्हॅलिडीटी, डेटा आणि क़ॉलिंगही

शफीक बागवान। राष्ट्र सह्याद्री

बेलापूर : खाजगी दूरसंचार कंपन्यांच्या वाढत्या रिचार्ज दरांच्या पार्श्वभूमीवर सरकारी दूरसंचार कंपनी भारत संचार निगम लिमिटेडने आपल्या ग्राहकांसाठी एक नवा आणि अत्यंत परवडणारा प्रीपेड प्लॅन सादर केला आहे. कंपनीने देशभरातील सर्व टेलिकॉम सर्कल्समध्ये २०२ रुपयांचा नवीन व्हाइस व्हाउचर प्लॅन गुपचूप लाँच केला आहे. या प्लॅनचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये युजर्सना एका महिन्यापेक्षा जास्त, म्हणजेच तब्बल ३२ दिवसांची व्हॅलिडीटी दिली जात आहे.

ज्या ग्राहकांना कमी खर्चात सिम कार्ड सक्रिय ठेवायचे आहे आणि ज्यांचा डेटा व कॉलिंगचा वापर मर्यादित आहे, अशा युजर्ससाठी हा प्लॅन अतिशय फायदेशीर ठरणार आहे. तब्बल ३२ दिवसांची सेवा वैधता, स्थानिक आणि एसटीडी नेटवर्कवर बोलण्यासाठी ३०० मिनिटे व्हॉइस कॉलिंग, ५ जीबी हाय-स्पीड डेटा, डेटा कोटा संपल्यानंतर युजर्सना ४० केबीपीएस या वेगाने अमर्यादित इंटरनेट वापरता येईल. याचबरोबर एकूण १०० मोफत एसएमएस आणि यासोबत ग्राहकांना विमा संरक्षण देखील दिले जात आहे.

ज्यांना अधिक डेटा आणि अमर्यादित कॉलिंगची आवश्यकता आहे, त्यांच्यासाठी बीएसएनएलचा २४७ रुपयांचा स्पेशल टॅरिफ व्हाउचर देखील उपलब्ध आहे. यामध्ये ३० दिवसांची सेवा वैधता, ५० जीबी हाय-स्पीड डेटा आणि सर्व नेटवर्कवर पूर्णपणे अनलिमिटेड व्हॉइस कॉलिंग देण्यात येत आहे. तसेच दररोज १०० एसएमएस आणि मेन अकाउंटमध्ये १० चा टॉक व्हॅल्यू मिळणार असल्याचे भारतीय संचार निगम लिमिटेड कंपनीकडून जाहीर झाले आहे.

निधनवार्ता

पंढरीनाथ चव्हाण



वैजापूर- येथील ज्येष्ठ नागरिक पंढरीनाथ दशरथ चव्हाण (८५) यांचे रविवारी पहाटे चार वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, तीन मुली, सुन, नातवंडे, जावई असा परिवार आहे. वैजापूर नगर पालिकेचे नगरसेवक प्रकाश चव्हाण यांचे ते वडील होते.

शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सविता देशमुख यांना 'नवदुर्गा महाराष्ट्र गौरव पुरस्कार'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान आणि महिला व मुलींच्या सक्षमीकरणासाठी राबविलेल्या विविध उपक्रमांची दखल घेत पोहेगाव येथील सविता शांताराम देशमुख यांना 'नवदुर्गा महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. नाशिक येथील मनु मानसी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे हा राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आला. नाशिकच्या पंचवटी विभागाच्या सभापती व नगरसेविका रोहिणीताई पिंगळे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

देशमुख या सिन्नर तालुक्यातील पाडळी येथील पाताळेश्वर माध्यमिक विद्यालयात गेल्या २८ वर्षांपासून उपशिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. अध्यापनासोबतच त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत महिला आणि मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले आहेत.

१९९९ पासून सीमा भागात देशसेवा करणाऱ्या जवानांसाठी माता, पालक आणि विद्यार्थिनींच्या सहकार्याने त्यांनी एक लाखांहून अधिक राख्या पाठविल्या आहेत. कुमारवयीन मुलींसाठी जीवनकौशल्य प्रशिक्षण, मुलींचे शिक्षण, शासकीय योजनांची माहिती तसेच 'गुड टच-बॅड टच'विषयी जनजागृती केली. आदिवासी मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, त्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करणे आणि शाळेत आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले.

म्हाळुंगी नदी स्वच्छता प्रकल्प, वाचन प्रेरणा दिन, हिंदी दिन, योग दिन, मुलींची आरोग्य तपासणी आणि जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान असे उपक्रम त्यांनी सातत्याने राबविले आहेत. या पुरस्काराबद्दल शिक्षक आमदार किशोर दराडे, पदवीधर आमदार सत्यजित तांबे, डॉ. सुधीर तांबे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि पोहेगाव पंचक्रोशीतील नागरिकांनी देशमुख यांचे अभिनंदन केले आहे.



पान १ वरुन

१२ हजार शेतकऱ्यांचा मुंबईवर धडक मोर्चा!

घाटातून मुंबईच्या दिशेने पुढे जाणार आहे.नमो शेतकरी योजनेचे प्रलंबित दोन हप्ते तातडीने जमा करावेत, पीकविम्याच्या संरक्षित रकमेइतकी दुष्काळभरपाई द्यावी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे, अशा प्रमुख मागण्या आंदोलकांनी केल्या आहेत. लाडकी बहीण योजनेची ई-केवायसी पुन्हा सुरू करणे, शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ, वनहक्क कायद्याची अंमलबजावणी, वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एक करणे आणि बांधकाम कामगारांच्या बंद योजना पुन्हा सुरू करण्याचाही मागण्यांत समावेश आहे. किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, महासचिव डॉ. विजू कृष्णन, राष्ट्रीय सहसचिव डॉ. अजित नवले, आमदार विनोद निकोले यांच्यासह राज्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. मुख्यमंत्र्यांनी शिष्टमंडळाशी सविस्तर चर्चा करून मागण्या लेखी स्वरूपात मान्य कराव्यात. मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशारा किसान सभेने दिला आहे. किसान सभेच्या मागण्या - नमो शेतकरी योजनेचे थकीत दोन हप्ते जमा करा. - दुष्काळग्रस्तांना पीकविम्याच्या संरक्षित रकमेइतकी भरपाई द्या. - नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाखांचे प्रोत्साहन अनुदान द्या. - लाडकी बहीण योजनेची ई-केवायसी पुन्हा सुरू करा. - पोषण आहार कर्मचाऱ्यांच्या मानधनात पाच हजार रुपयांची वाढ करा. - वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करून वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एक करा.- बांधकाम कामगारांच्या बंद योजना पुन्हा सुरू करा. - भंडारदरा धरणाचे पाणी आदिवासींना द्या; हिरड्याची सरकारी खरेदी सुरू करा. - पीकविम्याचे ट्रिगर पुन्हा लागू करा.

शिवरायांचा सह्याद्री वाचवा!

मरण आले तरी चालेल; पण हा लढा थांबणार नाही. महाराष्ट्राची जमीन विकू देणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.आदित्य ठाकरे यांच्या दौऱ्यात खासदार संजय राऊत, सुषमा अंधारे आणि अंबादास दानवे यांच्यासह शिवसेनेचे नेते सहभागी झाले. स्थानिकांनी वृक्षतोडीविरोधात आंदोलन तीव्र केले असून, पर्यावरणाच्या रक्षणासाठी व्यापक जनसमर्थन उभे करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

मंगळवार दि. २७ ऑक्टोबर २०२६

मिलनम डे

उदय-अस्त		सिंगल ५-१-९ मजबुत	
१२० ४३० ६७०	३-४	१५८ २४८ २२०	३६-८४-७१-२०-४९

कल्याण

उदय-अस्त		सिंगल ९-४-५ मजबुत	
१९० २८० २२६	०-२	१५६ १२९ ११०	०६-३२-४८-७५-२९

मुंबैम (मेन)

उदय-अस्त		सिंगल ४-७-९ मजबुत	
१२५ २६० २३४	८-१	१२८ १४६ १००	८६-२१-५४-९७-१०

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

शुभ लाभ

Date	Mon	Tue	Wed	Thu	Fri
27/07/2026 to 31/07/2026	259 60 550	590 42 228	358 62 390	400 47 890	160 70 488
03/08/2026 to 07/08/2026	234 90 569	170 85 159	338 42 129	460 09 478	370 05 348
10/08/2026 to 14/08/2026	577 99 234	230 53 148	250 70 235	355 39 135	133 76 358
17/08/2026 to 21/08/2026	240 60 460	278 73 346	116 82 480	156 23 779	449 77 179
24/08/2026 to 28/08/2026	360 96 795	255 23 229	789 42 237	450 98 440	266 41 290
31/08/2026 to 04/09/2026	149 43 670	170 81 560	159 52 336	690 50 235	577 99 135
07/09/2026 to 11/09/2026	680 47 557	228 27 124	570 26 358	112 43 779	445 33 689
14/09/2026 to 18/09/2026	789 47 124	336 20 139	799 56 178	680 42 345	399 16 790
21/09/2026 to 25/09/2026	390 25 348	457 62 129	480 23 599	166 30 479	150 60 280
28/09/2026 to 02/10/2026	669 19 135	137 18 279	260 84 570	660 29 126	369 84 770
05/10/2026 to 09/10/2026	140 57 250	459 85 168	130 48 567	469 99 126	558 84 590
12/10/2026 to 16/10/2026	160 79 568	290 11 669	122 58 189	130 46 123	257 42 480

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
१९०	३४५
०८	२१
१२५	५७९

अमरधाममध्ये दुसऱ्या शवदाहिनीसाठी शेडची नितांत आवश्यकता..!

प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अंत्यविधीच्या वेळी नातेवाईकांना मनस्ताप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

पारनेर : शहराचा दिवसेंदिवस चोहो बाजूंनी विस्तार होत असून, शहरातील लोकसंख्येतही वाढ होत आहे. मृत व्यक्तीच्या सोयीसाठी पारनेर-आळकुटी रोडलगत सर्व सुविधायुक्त अमरधाम उभारण्यात आले आहे. मात्र, या अमरधाममधील दुसरी शवदाहिनी अद्याप उघड्यावर असल्याने अंत्यविधीच्या वेळी नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात किंवा एकाच वेळी दोन अथवा त्यापेक्षा अधिक अंत्यविधी करावे लागल्यास मृत व्यक्तींच्या नातेवाईकांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे पारनेर नगरपंचायत प्रशासनाने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन दुसऱ्या शवदाहिनीसाठी सर्व सुविधायुक्त शेड उभारावे, अशी मागणी नगरसेवक अशोक चेडे यांनी केली आहे.

सर्व सुविधायुक्त शेड उभारण्याची नागरिकांची मागणी

पारनेर शहरातील नागरिकांना अंत्यविधीसाठी योग्य सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने अमरधाममध्ये शवदाहिन्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. याठिकाणी एका शवदाहिनीसाठी व्यवस्थित शेड उभारण्यात आले आहे. मात्र, शेजारी असलेल्या दुसऱ्या शवदाहिनीवर कोणत्याही प्रकारचे छत नसल्याने अंत्यविधीच्या वेळी अनेक अडचणी निर्माण होतात. उन्हाळ्यात कडक ऊन आणि पावसाळ्यात पावसाचा सामना करत अंत्यविधी करावा लागण्याची शक्यता असते. अशा संवेदनशील प्रसंगी नातेवाईकांना होणारा त्रास अधिकच वेदनादायी ठरतो.गेल्या दोन दिवसांत पारनेर शहरात चार व्यक्तींचे निधन झाले. दि. २४ रोजी दुपारनंतर एका व्यक्तीवर अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले, तर दि. २५ रोजी आणखी तीन व्यक्तींचे अंत्यविधी याच ठिकाणी पार पडले. अचानक चार अंत्यविधींची वेळ आल्याने उपलब्ध असलेल्या दोन शवदाहिन्यांवर ताण निर्माण झाला.

> अंत्यविधीसारख्या संवेदनशील प्रसंगी नातेवाईकांना किमान मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागू नये. त्यामुळे नगरपंचायत प्रशासनाने कोणत्याही दुर्घटनेची किंवा मोठ्या गैरसोयीची वाट न पाहता तातडीने कार्यवाही करावी आणि अमरधाममधील दुसऱ्या शवदाहिनीसाठी सर्व सुविधायुक्त शेड उभारावे,
>
> **भूषण शेलार**

यावेळी आधीच्या अंत्यविधीनंतर उरलेली गरम राख गोळा करून जागा मोकळी करावी लागली आणि त्यानंतर पुढील अंत्यविधी करण्यात आला. ही परिस्थिती नातेवाईकांसाठी मानसिकदृष्ट्या त्रासदायक ठरणारी होती.

एकाच वेळी दोन अंत्यविधी सुरू असताना पाऊस आल्यास उघड्यावर असलेल्या शवदाहिनीचा वापर करताना नातेवाईकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागू शकते. मृत व्यक्तीला अखेरचा निरोप देण्यासाठी आलेल्या



नातेवाईकांना अशा परिस्थितीत गैरसोय सहन करावी लागणे ही चिंतेची बाब आहे.

त्यामुळे अमरधाममध्ये केवळ शवदाहिनी उभारणे पुरेसे नसून, तिच्यासाठी आवश्यक छत आणि इतर मूलभूत सुविधांची उपलब्धता असणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

शहराचा वाढता विस्तार आणि नागरिकांची गरज लक्षात घेता पारनेर नगरपंचायत प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. दुसऱ्या शवदाहिनीसाठी तातडीने शेड उभारून पावसापासून संरक्षण, पुरेशी जागा आणि अंत्यविधीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

द•ख•ल



भगवान बाबा मल्टीस्टेट गैरव्यवहारप्रकरणी ठेवीदार आक्रमक; एसपी कार्यालयासमोर आंदोलन

शेवगाव : आर्थिक गैरव्यवहाराच्या झळा सोसणाऱ्या श्री संत भगवान बाबा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या ठेवीदारांचा असंतोष सोमवारी आंदोलनाच्या माध्यमातून उफाळून आला. या प्रकरणातील उर्वरित सर्व आरोपींना तातडीने अटक करावी, या मागणीसाठी शेवगाव, पाथर्डी, श्रीरामपूर आणि अहिल्यानगर परिसरातील सुमारे ६० ते ७० ठेवीदारांनी सोमवारी (दि. २६) सकाळी अकराच्या सुमारास जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर धडक दिली. 'सर्व आरोपींना अटक झालीच पाहिजे', अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडत ठेवीदारांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. आंदोलकांनी जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांना निवेदन देऊन प्रकरणातील उर्वरित आरोपींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली. संस्थेच्या विद्यमान चेअरमन मंदाकिनी रंगनाथ वैद्य आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जयशाली मयूर वैद्य यांना अटक करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. याशिवाय, जयशाली वैद्य यांच्या बहिणी वैशाली योगेश गायकवाड यांना संस्थेमार्फत ३० कोटी रुपयांचे कर्ज दिल्याची नोंद असल्याचा दावा आंदोलकांनी केला. या व्यवहाराची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

दुष्काळात सरकारी अधिकाऱ्याची फ्लेक्सबाजी



पाथर्डी : राज्यात दुष्काळी परिस्थितीचे सावट असताना शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. अशा संवेदनशील परिस्थितीत पाथर्डी पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात एका शासकीय आरोग्य अधिकाऱ्याच्या वाढदिवसानिमित्त लावण्यात आलेल्या फ्लेक्समुळे तालुक्यात चर्चेला उधाण आले आहे. दुष्काळाच्या काळात साधेपणा जपण्याची आणि अनावश्यक सार्वजनिक प्रदर्शन टाळण्याची अपेक्षा असताना शासकीय कार्यालयाच्या आवारातच वाढदिवसाची फ्लेक्सबाजी झाल्याने प्रशासनाच्या सामाजिक संवेदनशीलतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सत्कार समारंभ, हार-तुरे, फ्लेक्सबाजी आणि सार्वजनिक स्वरूपातील आनंदोत्सव टाळून साधेपणा पाळण्याचा संदेश शासनाकडून दिला जात असल्याच्या पार्श्वभूमीवर या घटनेकडे पाहिले जात आहे. सुमारे दोन महिन्यांपूर्वी आमदार मोनिका राजळे यांनीही आपल्या भाषणातून कार्यकर्ते आणि प्रशासनाला दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून अनावश्यक उत्सवी कार्यक्रम टाळण्याचा संदेश दिला होता. जनतेच्या अडचणी लक्षात घेऊन सार्वजनिक जीवनात संयम आणि सामाजिक बांधिलकी जपण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली होती. मात्र, त्यानंतर शासकीय कार्यालयाच्या आवारातच सरकारी अधिकाऱ्याच्या वाढदिवसाचा फ्लेक्स झळकल्याने या संदेशाच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. पंचायत समितीच्या आवारातील या वाढदिवसाच्या फ्लेक्समुळे दुष्काळी परिस्थितीत साधेपणा जपण्याचा संदेश, शासकीय कार्यालयाची प्रतिष्ठा आणि लोकसेवकांची सामाजिक जबाबदारी हे मुद्दे पुन्हा चर्चेत आले आहेत.

नेप्ती नाका येथे कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या गार्यींची सुटका

अहिल्यानगर : शहरातील नेप्ती नाका कल्याण रोड परिसरात कत्तलीसाठी दाटीवाटीने व अमानुषपणे डांबून नेल्या जाणाऱ्या दोन गार्यींना तोफखाना पोलिसांनी धाडसी कारवाई करत मुक्त केले आहे. या प्रकरणी वाहन चालकासह दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवार दि. २५ रोजी रात्रीच्या सुमारास आपत्कालीन यंत्रणेवर मिळालेल्या माहितीनुसार, नेप्ती नाका येथे एका पिकअप वाहनातून जनावरे कत्तलीसाठी नेण्यात येत असल्याचे समजले. सदर पिकअप वाहनात दोन जर्शी गायी अत्यंत दाटीवाटीने, उपाशीपोटी आणि विनाअन्नपाण्याचे क्रूरपणे डांबून कत्तलीसाठी वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले. या बेकायदेशीर वाहतूक प्रकरणी पोलिसांनी घटनास्थळावरून रज्जाक इब्राहिम पठाण (रा. पिंपळाचा मळा, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) आणि पिकअप चालक निलेश मनोहर बेल्हेकर (रा. टाकळीमियाँ, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) या दोघांना ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलीस नाईक महेश बाळासाहेब शेळके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपींविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

समर्थ फार्मसीत 'आविष्कार २०२७' विभागीय फेरी उत्साहात संपन्न

३० महाविद्यालयांतील २५० हून अधिक विद्यार्थी व शिक्षकांचा सहभाग

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



निघोज : समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे यांच्या अंतर्गत आयोजित 'आविष्कार २०२७' या पुणे-मुंबई विभागीय फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत ३० महाविद्यालयांतील २५० हून अधिक विद्यार्थी व शिक्षक प्रतिनिधींनी सहभाग घेतला. विविध संशोधन शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नावीन्यपूर्ण प्रकल्पांमुळे स्पर्धेत संशोधन आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रभावी प्रत्यय आला.

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करणे, सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आणि नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्पांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. स्पर्धेची सुरुवात सरस्वती पूजन आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमापूजनाने झाली. विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेंटेशनसह निर्धारित पद्धतीनुसार आपल्या संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण केले. संशोधनाची गुणवत्ता, नावीन्यता, सादरीकरणातील स्पष्टता आणि प्रकल्पांची व्यावहारिक उपयुक्तता या निकषांवर परीक्षकांनी मूल्यमापन केले. विद्यार्थ्यांना संशोधन अधिक प्रभावी ठरणार करण्यासाठी मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या. या विभागीय फेरीत यजमान समर्थ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे येथील कु. वैष्णवी मोरे हिने कृषी आणि पशुसंवर्धन या संशोधन शाखेतील पदवी स्तरावर सुवर्णपदक पटकावले.

शेवगाव-नेवासा महामार्गाची दुरवस्था; खड्डे आणि ऊस वाहतुकीमुळे अपघातांचा धोका

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : शेवगाव-नेवासा महामार्गावरील शेवगाव ते जोहरापूर दरम्यानच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून, जागोजागी पडलेले खोल खड्डे आणि उखडलेल्या डांबरामुळे हा मार्ग वाहनचालकांसाठी जीवघेणा ठरत आहे. सध्या साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू असल्याने वाढलेली ऊस वाहतूक आणि खचलेल्या साईड पट्ट्यांमुळे येथे अपघातांची शक्यता बळावली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे तातडीने लक्ष न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

खडी पसरल्याने वाहने घसरण्याचे प्रमाण वाढले. शेवगाव ते जोहरापूर या रस्त्यावरील डांबर पूर्णपणे उखडले असून सर्वत्र खडी पसरली असून मोठाले खड्डे पडले आहे. त्यामुळे दुचाकी वाहने घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे. रस्त्यावरील खड्डे चुकवण्याच्या नादात अनेकदा वाहनांचा तोल जाऊन किरकोळ व गंभीर अपघात घडत आहेत. या मार्गावरून दररोज शाळकरी विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी, प्रवासी यांच्यासह एसटी बसेस, दुचाकी, तीनचाकी व चारचाकी वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र, खराब रस्त्यामुळे प्रवाशांना मणक्याचे आजार आणि वाहनांचे मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. सध्या साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू असल्याने या महामार्गावरून ऊसाने भरलेले ट्रॅक्टर, ट्रॉल्या आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणत्याही मोठ्या दुर्घटनेची वाट न पाहता तातडीने रस्त्यावरील खड्डे बुजवावेत, खचलेल्या साईड पट्ट्या भरून घ्याव्यात आणि या रस्त्याच्या निकृष्ट कामाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदारांवर कडक कारवाई करावी. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. प्रशासनाने या समस्येची तात्काळ दखल घेऊन दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू न केल्यास शेतकरी, प्रवासी आणि वाहनधारकांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे रस्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

शेषराव आपशेटे

अवजड डंपर यांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या साईड पट्ट्या मोठ्या प्रमाणात खचल्या असून त्या भरण्याचे काम प्रशासनाने केलेले नाही.

ग्रामीण भागात एसटी बसच्या फेऱ्या वाढल्या

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

ढोरजळगांव : ग्रामीण भागात यापूर्वी लाल परीच्या मुख्य रस्त्यावर फे-या असत परंतु आव्हाणे ,ब-हाणपुर,तेलकुडगांव अशी काही आडवळणी गावे आहेत त्याठिकाणी जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यासाठी तालुक्याला जावे लागत असत व तेथुन पुढे बस धरावी लागत असल्यामुळे वेळ मोठा जात आसे परंतु ग्रामीण भागातील छोट्या गावातून एसटी बस सुरू झाल्यामुळे वृध्दांना व शालेय विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होणार असुन ग्रामीण भागात लाल परीच्या फे-या वाढल्यामुळे वेळेच्या बचतीबरोबर ग्रामस्थांना सुरक्षित प्रवास सुकर झाला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तसेच महिला व नागरीकांना येणाऱ्या एसटी बसच्या समस्या लक्षात घेऊन ढोरजळगांव येथील व सध्या अहिल्यानगर येथे राज्य परिवहन महामंडळाच्या विभागीय ग्राहक भंडार येथे कार्यरत असलेले गणेश भारत खोसे यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून ग्रामीण भागात उप रस्त्यावर पहिल्यांदाच बसच्या फेऱ्या वाढविण्यासाठी पाठपुरावा केला व त्याला ख-या अर्थाने यश मिळाले असुन स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच शेवगाव तालुक्यातील ब-याचशा गावामधुन जिल्हा व जिल्हा बाहेरील एसटी बस जाण्यास सुरुवात झाली आहे.त्यामध्ये भाविकांना अक्कलकोट,तसेच नाशिक या देवस्थानला जाण्याचा मार्ग सुकर झाला असुन परीणामी खाजगी वाहनांचा खर्चही कमी होणार आहे. शनिवारी नेवासा ते अक्कलकोट एसटी बसचे ढोरजळगांवशे,तसेच तेलकुडगांव, त्रिमूर्ती शौक्षणिक संकुल,आव्हाणे याठिकाणी जोरदार स्वागत करण्यात आले.

श्रीगोंद्यात रेशनमधून निकृष्ट धान्याचा खडा व कचरा बाहेर

सर्जेराव साळवे। राष्ट्र सह्याद्री

तहसीलदार म्हणतात 'बदलून देऊ'!



बेलवंडी : सण-उत्सवांच्या दिवसांत गोरगरिबांच्या घरात गोडधोड जेवणाचा आनंद लाभावा, यासाठी शासनाकडून स्वस्त धान्य दुकानमार्फत अन्नधान्य दिले जाते. मात्र, श्रीगोंदा तालुक्यात प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे याउलट चित्र पाहायला मिळत आहे. दिवाळीच्या तोंडावर तालुक्यातील अनेक रेशन दुकानांमधून अत्यंत निकृष्ट दर्जाचे आणि खाण्यायोग्य नसलेले धान्य वितरित केले जात असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

एका बाजूला सणाच्या आनंदात सर्वजण मग्न असताना, दुसऱ्या बाजूला शासनाकडून जनतेच्या आरोग्याशी खेळ खेळला जात असल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. धान्याच्या पोत्यांमध्ये सडलेला, तुटलेला माल आणि मोठ्या प्रमाणावर कचरा व खडे असल्याचे उघड झाले आहे. हे धान्य पाहून सणासुदीच्या काळात जनतेला अशा प्रकारचे निकृष्ट धान्य देऊन सरकार नागरिकांची चेष्टा करत आहे का? असा संतप्त सवाल सर्वसामान्य जनतेतून विचारला जात आहे.

केवळ दर्जाचाच प्रश्न नसून, यामध्ये वजनाचाही मोठा सावळागोंधळ समोर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, धान्याचे एक पोतं जवळपास ४८ ते ४९ कि.ग्रॅ. भरत आहे. म्हणजेच, प्रत्येक पोत्यामागे सर्रासपणे तब्बल दोन किलो धान्य कमी भरत असल्याचे निदर्शनास आले आहे. हा वजनाचा तोटा थेट स्वस्त धान्य दुकानदारांना सहन करावा लागत असल्याने दुकानदारांमध्येही प्रशासनाविषयी तीव्र नाराजी पसरली आहे.

दिवाळीसारख्या पवित्र सणाच्या पार्श्वभूमीवर जर गोरगरिबांच्या वाट्याला असे हलक्या दर्जाचे आणि तुटपुंजे धान्य येत असेल, तर अन्न सुरक्षा यंत्रणेचा कारभार लक्तरांवर पडला आहे. मात्र, प्रशासनाच्या अशा आश्वासनांमुळे गोरगरिबांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आणि मुळापासून भ्रष्ट असलेल्या पुरवठा यंत्रणेवर कठोर वचक बसणार का, असा सवाल संतप्त नागरिकांमधून विचारला जात आहे. आता प्रशासन याप्रकरणी केवळ शब्दांची मलमपट्टी करणार की दोषींवर प्रत्यक्ष कारवाईचा बडगा उगारणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

कुकडी नदीवरील के.टी. वेअर बंधारे भरण्याची पालकमंत्री विखे पाटील यांचेकडे मागणी

पारनेर तालुक्यातील ११ गावांतील पाणीटंचाई दूर करण्यासाठी जलसंपदा मंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : पारनेर तालुक्यातील कुकडी नदीवरील कोल्हापूर पद्धतीचे बंधारे (के. टी. वेअर) कुकडी डाव्या कालव्याच्या आवर्तनातून भरून देण्यात यावेत, अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे निघोज-कान्हूर पठार मंडलाध्यक्ष तथा पंचायत समिती सदस्य दिनेश बाबर यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. डॉ. राधाकृष्णजी विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पारनेर तालुक्यातील रेनवडी, जांबूत, शरदवाडी, बाबरमळा, वडनेर बुद्रुक, भाकरेवाडी, निघोज कुड, गाडीलगाव, गुणोरे, म्हसे खुर्द आणि कोहकडी या गावांतील कुकडी नदीवरील बंधारे कुकडी डाव्या कालव्याच्या आवर्तनातून भरून देण्याची मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

पारनेर तालुक्यातील अनेक गावांमध्ये शेती, पिण्याचे पाणी आणि पशुधनाच्या पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे. कुकडी नदीवरील के.टी. वेअर बंधाऱ्यांमध्ये पाणी साठल्यास परिसरातील पाणी उपलब्धता वाढण्यास मदत होईल. या पाण्याचा उपयोग संबंधित गावांतील पाणीपुरवठा



योजनांसाठी, जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी तसेच रब्बी हंगामासह विविध पिकांना आवश्यक पाणी उपलब्ध करून देण्यासाठी होऊ शकतो.

बंधाऱ्यांमध्ये पुरेसा पाणीसाठा झाल्यास शेतकऱ्यांना सिंचनासाठी आधार मिळेल. ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याबाबत दिलासा मिळण्यास मदत होईल, तसेच पशुपालकांनाही मोठा फायदा होऊ शकतो. त्यामुळे संबंधित गावांच्या पाणीप्रश्नाच्या दृष्टीने ही मागणी महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

कुकडी डाव्या कालव्याच्या उपलब्ध आवर्तनातून या बंधाऱ्यांमध्ये पाणी सोडण्याचे योग्य नियोजन करण्यात यावे. यासाठी संबंधित जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देऊन तांत्रिक बाबींची पडताळणी करावी आणि पाण्याचे नियोजन करून बंधारे भरून देण्यासाठी कार्यवाही करावी, अशी विनंती दिनेशदादा बाबर यांनी निवेदनातून केली आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, सोलापूर; अधीक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ, पुणे; तसेच कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्रमांक १, नारायणगाव यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत.

ग्रामीण भागातील पाणीटंचाई, शेतीच्या सिंचनाचा प्रश्न आणि पशुधनासाठी पाण्याची उपलब्धता या बाबींचा विचार करून कुकडी नदीवरील बंधारे भरण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित विभागाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन उपलब्ध पाण्याचे नियोजन करावे आणि आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा बाबर यांनी व्यक्त केली आहे.

दखल

भीमाशंकरकडून रु. १७७ प्रमाणे रक्कम बँकेत जमा

लोणी धामणी : दत्तात्रयनगर, पारगाव तर्फे अवसरी बु, (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याने सन २०२५-२६ गाळप हंगामामध्ये गाळप केलेल्या ८,८३,०६९ मे.टन ऊसास रु.१७७/- प्रती मे. टनाप्रमाणे रक्कम रु. १५ कोटी ६३ लाख ३ हजार सोमवार (२६ ऑक्टोबर) रोजी ऊस उत्पादक शेतक-यांच्या बँक खात्यावर वर्ग केली असल्याची माहीती कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी दिली.

कारखान्याचे संस्थापक-संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार मंत्री मा.आ.श्री. दिलीपराव वळसे पाटील यांचे मार्गदर्शनाखाली मा. संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये कार्यक्षेत्र व परिसरातील गाळप केलेल्या एकूण ८,८३,०६९ मे. टन ऊसासाठी रु. ३,५००/- प्रती मे.टन अंतिम ऊस दर जाहीर केलेला आहे. अदा केलेला ऊस दर वजा जाता देय असलेली उर्वरीत रक्कम रु. १७७/- प्रती मे. टनाप्रमाणे होणारी रक्कम रु. १५ कोटी ६३ लाख ३ हजार ऊस उत्पादक शेतक-यांच्या बँक खात्यावर वर्ग केली आहे. दिपावलीपूर्वी शेतक-यांच्या बँक खात्यावर अंतिम हप्त्याची रक्कम वर्ग करून जाहीर केल्याप्रमाणे दिलेला शब्द पूर्ण केला आहे.कारखान्याने एफ. आर.पी.ची रक्कम नेहमीच वेळेत दिलेली आहे. याशिवाय वाढीव रक्कम अंतिम हप्त्याचे स्वरुपात ऊस उत्पादक शेतक-यांना दिलेली असल्याने ऊस उत्पादक शेतक-यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. भीमाशंकर कारखान्याने आजपर्यंत सभासद, बिगर सभासद व गेटकेन अशा प्रकारचा कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान ऊस दर देण्याची परंपरा कायम ठेवली आहे. गाळप हंगाम २०२६-२७ मधील संपूर्ण ऊसाचे गाळप करण्याचे पूर्ण नियोजन केले आहे. त्यासाठी ऊस तोड व वाहतूक यंत्रणा हजर झालेली असून कारखाना पुर्ण क्षमतेने गाळप करीत आहे. कार्यक्षेत्र व परिसरातील सर्व ऊस उत्पादक शेतक-यांनी भीमाशंकर कारखान्यास आपला ऊस देवून पुर्वीप्रमाणेच सहकार्य करावे असे आवाहन कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रदीप वळसे पाटील यांनी केले.

खामगाव जिल्हा परिषद शाळेत सुरक्षित बालपण अभियान संपन्न



आळेफाटा : तालुका विधी सेवा समिती जुन्नर यांच्या वतीने आज दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खामगाव(ता. जुन्नर)येथे 'सुरक्षित बालपण' अभियानांतर्गत कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या वार्षिक कार्यक्रम पत्रिकेनुसार सकाळी ११ ते १२ या वेळेत हे शिबीर घेण्यात आले. जिल्हा न्यायाधीश-१ तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष एस. बी. शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून जुन्नर वकील बार असोसिएशनचे उपाध्यक्ष निलीमा शेरकर व करमेश गाडेकर यांनी मार्गदर्शन केले. तालुका विधी सेवा समितीचे समन्वयक प्रशांत मोरतळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अंकुश घोलप, मुख्याध्यापक तानाजी तळपे, दिलीप लोकरे, अजिंक्य घोलप, अंकुश कोकणे, राहुल रावते यांच्यासह विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बालकांचे हक्क, बालसुरक्षा, पोक्सो कायदा, वैयक्तिक व ऑनलाईन सुरक्षितता, तक्रार यंत्रणा व मोफत कायदेशीर सहाय्य यावर जनजागृती करण्यात आली.प्रास्ताविक प्रशांत मोरतळे यांनी केले. सूत्रसंचालन दिलीप लोहकरे तर आभार तानाजी तळपे यांनी मानले.

वसरी खुर्द येथील मयूर पतसंस्थेच्या वतीने सभासदांना किराणाचे वाटप

निरगुडसर : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात अग्रेसर असलेली अवसरी खुर्द येथील मयूर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांची दिवाळी गोड व्हावी म्हणून रवा, मैदा, साखर, तेल, बेसनपीठ, तेल, मोती साबण इत्यादी किराणा वाटप संस्थेचे चेअरमन हरिदास रामवत यांच्या हस्ते करण्यात आल्याची माहिती संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावजी बांगर यांनी दिली. एन दुष्काळात सभासदांना दिवाळीचा फराळ करण्यासाठी किराणा वस्तू मिळाल्याने महिलांनी समाधान व्यक्त केले आहे. अवसरी खुर्द येथील मयूर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था नेहमीच सभासदांचे हित जोपासण्याचे काम करत आहे.

संस्थेच्या वतीने दरवर्षी सहलीचे आयोजन केले जात असून सभासदांसाठी रामेश्वर, कन्याकुमारी, काशी, अयोध्या, तिरुपती बालाजी, शिर्डी, भीमाशंकर दर्शन घडविले आहे. पुढील वर्षी राजस्थान येथे सहलीचे नियोजन करण्यात येणारा असल्याचे सांगण्यात आले. संस्थेने सभासदांचे मांगणीनुसार १३ टक्के लाभांश वाटप करण्यात आला असून संस्थेकडे ४० कोटी रुपयांच्या ठेवी असून संस्थेने सभासदांना २४ कोटी रुपये वाटप केले आहे. संस्थेचे खेळते भांडवल ४७ कोटी ७० लाख आहे संस्थेने २२ कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून संस्थेला ७० लाख रुपयांचा नफा झाला असून संस्थेचे एकूण सभासद ९११ आहे संस्थेने सभासदांसाठी खास दिवाळीनिमित्त अल्प व्याजदरात चारचाकी वाहनासाठी कर्ज वाटप करण्याचा निर्णय घेतला असून जास्तीत जास्त सभासदांनी नवीन वाहन खरेदी करावी असे आव्हान चेअरमन हरीदास रामवत यांनी केले आहे.

कचरा जाळल्याने भूमिगत वीजवाहिन्या जळाल्या

ताथवडे-पुनावळेतील १६ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : वाल्हेकरवाडी येथे महादेव मंदिराजवळील उड्डाणपुलाच्या परिसरात अद्यात व्यक्तीने कचरा जाळण्यात आल्यामुळे आज (दि. २६ ऑक्टोबर) दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास TACO-1 आणि TACO-2 या उच्चदाब भूमिगत विद्युत वाहिन्यांच्या चालू व पर्यायी अशा दोन्ही २२ केव्ही इनकमर केबल जळाल्या. यामुळे २२/११ केव्ही बेंचमार्क उपकेंद्र आणि २२/११ केव्ही पेठकर उपकेंद्रांतून निघणाऱ्या ११ केव्ही उच्चदाब वीजवाहिन्यांचा वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे.

या घटनेमुळे पुणे-मुंबई महामार्गाच्या पश्चिमेकडील ताथवडे आणि पुनावळे परिसरातील सुमारे १५ ते १६ हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे.

चालू वीजवाहिनीसोबतच पर्यायी वाहिनीची केबलही जळाल्यामुळे अन्य पर्यायी मार्गाने वीजपुरवठा सुरळीत करण्यावर मर्यादा आल्या आहेत. त्यामुळे बाधित वीजवाहिन्यांच्या केबल जोडण्यासह वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांकडून युद्धपातळीवर शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

वीजवाहिन्यांजवळ कचरा जाळू नका !

उच्चदाब भूमिगत वीजवाहिन्या, वीज केबल्स तसेच वीजयंत्रणेजवळ कचरा जाळल्यामुळे केबलसचे नुकसान होऊन मोठ्या परिसरातील वीजपुरवठा खंडित होऊ शकतो. अशा घटनांमुळे नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागतो, तसेच महावितरणच्या वीजयंत्रणेचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी वीजवाहिन्या, भूमिगत केबल मार्ग आणि विद्युत यंत्रणेजवळ कचरा जाळू नये. कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावून महावितरणच्या वीजयंत्रणेची सुरक्षितता राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात येत आहे.



ताथवडे आणि पुनावळे परिसरातील वीजग्राहकांनी वीजपुरवठा पूर्ववत होईपर्यंत संयम राखून महावितरणला सहकार्य करावे. केबल दुरुस्तीचे काम पूर्ण करून वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत.

जिल्ह्यात रब्बी ज्वारी लागवडीला कृषी विभागाचे प्रोत्साहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : रब्बी हंगामातील ज्वारी पिकाचे क्षेत्र वाढवण्यासह शेतकऱ्यांची उत्पादकता वाढवण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण उप अभियानांतर्गत रब्बी ज्वारी सन २०२६- २७ योजनेअंतर्गत पुणे जिल्ह्यासाठी १५ हजार ८६० बियाणे मिनीकिट म्हणजेच ६३४ क्विंटल रब्बी ज्वारी बियाणांचे उद्दिष्ट मंजूर करण्यात आले आहे. या योजनेचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले आहे.

कमी पर्जन्यमान आणि संभाव्य दुष्काळ सदृश्य परिस्थिती लक्षात घेता कमी पाण्यात चांगले उत्पादन देणाऱ्या तसेच दर्जेदार चारा उपलब्ध करून देणाऱ्या रब्बी ज्वारी पिकाला प्रोत्साहन देण्यावर शासनाचा भर आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना सुधारित वाणांच्या बियाणांचा लाभ मिळणार असून प्रतिकूल परिस्थितीतही पीक उत्पादन टिकवून ठेवण्यास मदत होणार आहे. रब्बी ज्वारी हे अन्नधान्याबरोबरच पशुधनासाठी दर्जेदार चारा उपलब्ध करून देणारे महत्त्वाचे पीक आहे.

कमी पाण्यात येणाऱ्या या पिकाच्या लागवडीला प्रोत्साहन मिळाल्यास शेतकऱ्यांचे संभाव्य आर्थिक नुकसान कमी करण्यास आणि शेतीची उत्पादकता वाढवण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर त्वरित नोंदणी करुन या योजनेचा लाभ घ्यावा. उपलब्ध बियाणांचा योग्य वापर करावा आणि वेळेवर पेरणी करून उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करावेत असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले आहे.

एका मिनी किट मध्ये काय मिळणार ?

या योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र शेतकऱ्याला एका मिनी किटमध्ये पुढील साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. परभणी सुपरमोती, फुले यशोमती, पीकेव्ही शक्ती या सुधारित वाणांचे ४ किलो ज्वारी बियाणे, पिकाच्या वाढीसाठी उपयुक्त जैविक खत, ज्वारी पिकाच्या योग्य लागवडीसाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरीच्या दर्शनासाठी नायगाव येथे भाविकांची गर्दी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

माळशिरस : पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील श्रीक्षेत्र नायगाव येथे जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी मंदिरात कोजागिरी पौर्णिमा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. कोजागिरीनिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांचे दर्शन घेतले.

कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने पहाटे पांडेश्वर येथून ग्रामस्थांनी आणलेल्या कऱ्हा नदीच्या पाण्याने श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांना स्नान घालण्यात आले. त्यानंतर ह.भ.प. सचिन महाराज रसाळ (देऊळगाव रसाळ) यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले.त्यांनी विनामूल्य सेवा दिली. आपल्या रसाळ वाणीतून विविध दृष्टांत, उदाहरणे आणि आध्यात्मिक विचार मांडत त्यांनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले.कीर्तनास आबा महाराज बोरकर,मोरे महाराज व चांगण महाराज यांनी साथ दिली.मृदुंगाची साथ तेजस खेसे यांनी केली, तर नायगाव भजनी मंडळाने भजनाची सेवा बजावली. विणेकरी म्हणून ह.भ.प. तुकाराम चौंडकर यांनी सेवा केली.श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची आकर्षक महापूजा पुजारी सचिन जगताप यांनी केली.मंदिर परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.कोजागिरी पौर्णिमेनिमित्त भाविकांसाठी अन्नदानाचेही आयोजन करण्यात आले.मधुकर दोरगे (यवत), संदीप पवार (फुरसुंगी), देविदास होले (उंड्री), पांडुरंग महानवर (एकेरीवाडी), राजेंद्र होले, सुनीता होले (सासवड), सविता गद्रे (माळशिरस), तुषार शेंडगे (हडपसर), बाळासो खेसे,राकेश कड, सुवर्णा जगताप (नायगाव) व अंकुश शेंडगे (चौफुला) यांच्या वतीने भाविकांना अन्नदान करण्यात आले.भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थ नायगाव यांच्या वतीने मंदिर परिसरातील स्वच्छता,पाणीपुरवठा, दर्शनबारी तसेच इतर आवश्यक सुविधांची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे कोजागिरी पौर्णिमेचा धार्मिक सोहळा शांततेत व उत्साहात पार पडला.

श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांच्या कृपेने नायगावच्या धार्मिक परंपरेला अधिक बळ मिळत असून,भाविकांचा वाढता सहभाग हे या देवस्थानावरील श्रद्धेचे प्रतीक आहे, अशी भावना भाविक भक्त व ग्रामस्थांनी व्यक्त केली. कार्यक्रमाची माहिती राहुल कड यांनी दिली.



दिवे येथे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आयोजित महाभोंडल्यात सहभागी झालेल्या महिला

दिवे परिसरात कोजागिरी पौर्णिमा उत्साहात साजरी

महिलांच्या महाभोंडल्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

दिवे, : दिवे परिसरात कोजागिरी पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त महिलांसाठी महाभोंडल्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला दिवे परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने महिलांनी एकत्र येत भोंडल्याच्या पारंपरिक गीतांमधून सांस्कृतिक परंपरेचे जतन केले.

या उपक्रमामुळे परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. दिवे येथील खांबाई माता मंदिरातही कोजागिरी पौर्णिमेनिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अशी माहिती दिवे गावचे माजी सरपंच गुलाब झेंडे यांनी दिली. यावेळि माजी उपसरपंच रूपाली झेंडे, अर्चना झेंडे, पायल झेंडे, सिमा झेंडे, प्रियांका झेंडे, दिव्या झेंडे, आरती झेंडे , मनिषा फडतरे, वैशाली झेंडे, किरण झेंडे, संगीता गायकवाड व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

शेतमजूर महिलांवर बेकायदेशीर सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून वाईट नजर

शेतात नजर ठेवणाऱ्या नराधमावर कारवाईची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

दौंड : शेतात काम करणाऱ्या महिला मजुरांच्या प्रायव्हसीवर (गोपनीयतेवर) गदा आणणारा एक संतापजनक प्रकार समोर आला आहे. महिलांवर वाईट नजरेने पाळत ठेवण्यासाठी शेतात बेकायदेशीरपणे सीसीटीव्ही (उउढत) कॅमेरा बसवण्यात आला होता. हा प्रकार लक्षात येताच शेतमजूर महिलांचा संताप अनावर झाला आणि त्यांनी एकत्र येत तो सीसीटीव्ही कॅमेरा जागेवरच फोडून टाकला. याप्रकरणी दोषी व्यक्तीवर तात्काळ कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महिलांनी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दौंड तालुक्यातील हातवळण (ता. दौंड) येथील संबंधित शेतात दररोज अनेक महिला मजूर शेतीकामासाठी येतात. दिवसभर शेतात कष्ट करावे लागत असल्याने, कपडे बदलण्यासाठी किंवा इतर वैयक्तिक कारणांसाठी महिला शेतातील एका आडोशाचा वापर करत असत. मात्र, याच जागेवर महिलांना लक्ष्य करून एक सीसीटीव्ही कॅमेरा लपवून बसवण्यात आल्याचे काही महिलांच्या निदर्शनास आले. शेतात काम करताना महिलांना कपडे बदलून किंवा सोयीस्कर कपडे घालून काम करावे लागते. अशा



हक्काच्या आणि खाजगी जागेवर कॅमेरा बसवून आपल्यावर नजर ठेवली जात असल्याचा सुगावा लागताच महिलांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली.

महिलांचा रणरागिणी अवतार; कॅमेरा केला चकणाचूर..

आपल्या अब्रूशी आणि गोपनीयतेशी खेळ होत असल्याचे पाहून शेतातील सर्व महिला एकत्र आल्या. त्यांनी थेट कॅमेरा लावलेल्या ठिकाणी जाऊन तो हुसकावून लावला आणि दगडाने फोडून त्याचा चक्काचूर केला.

आम्ही शेतात पोट भरण्यासाठी कष्टाचे काम करतो, मात्र आमच्यावर अशा प्रकारे वाईट नजरेने पाळत ठेवून व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे अत्यंत निंदनीय आहे, अशा शब्दांत महिलांनी आपला रोष व्यक्त केला.

संतप्त महिलांची कारवाईची मागणी..

हा प्रकार केवळ कॅमेरा फोडण्यापुरता मर्यादित न ठेवता, महिलांनी या विकृत कृत्याविरोधात आक्रमक पाऊल उचलले आहे. महिलांवर बेकायदेशीरपणे नजर ठेवणाऱ्या आणि त्यांच्या गोपनीयतेचा भंग करणाऱ्या संशयित व्यक्तीवर तातडीने गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात यावी, अशी मागणी महिलांनी केली आहे. जर पोलिसांनी यावर कडक कारवाई केली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही महिलांनी दिला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

शिरूर नगरपरिषदेच्या राजकारणात नव्या घडामोडींना वेग

नगरपरिषदेतील सर्व घटकांना विश्वासात घेऊन आणि सर्वांना सोबत घेऊन शिरूर शहराचा चेहरामोहरा बदलणार : नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



शिरूर : शिरूर नगरपरिषदेच्या राजकारणात नव्या घडामोडींना वेग आला असून शहराचा विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवत शिरूर नगरपरिषद भारतीय जनता गट सत्तेत सहभागी होवून पाठिंबा देत असल्याचे पत्र गटनेते नितीन पाचर्णे यांनी शिरूर शहर नगरपरिषद गटाच्या गटनेता व नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांना दिल्याने स्थानिक राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे.मात्र या महत्त्वपूर्ण घडामोडीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष गटाचे उपनगराध्यक्ष व नगरसेवक अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून नगरपरिषदेतील पुढील राजकीय हालचालींकडे शिरूरकरांचे लक्ष लागले आहे.

शिरूर शहराचा वाढता विस्तार आणि नागरिकांच्या प्रलंबित नागरी समस्यांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही गटांनी एकत्रितपणे काम करण्याची भूमिका मांडली आहे. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, भुयारी गटार योजना आणि वाहतूक कोंडी यांसारखे प्रश्न मार्गी लावण्याबरोबरच विकासकामांना गती देण्याचा निर्धार यावेळी सर्वांकडून व्यक्त करण्यात आला. शहराच्या हिताला प्राधान्य देणार असल्याचे नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी स्पष्ट करत गटनेते नितीन पाचर्णे यांनी विकासाच्या वाटचालीत विश्वास दाखवत पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.नगरपरिषदेतील सर्व घटकांना विश्वासात घेऊन आणि सर्वांना सोबत घेऊन शिरूर शहराचा चेहराम ोहरा बदलण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचेही नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी सांगितले. नगरसेवक तथा गटनेते नितीन पाचर्णे यांनी शहराचा सर्वांगीण विकास आणि नागरिकांचे हित लक्षात घेऊन सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. जिल्ह्याचे नेते प्रदीप कंद आणि तालुक्याचे नेते राहुल पाचर्णे यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी नगरपरिषदेच्या कामकाजात नेहमीच सहकार्याची भूमिका घेतल्याने आता एकत्रितपणे शहराच्या विकासासाठी काम करण्याचा निर्धार गटनेते नितीन पाचर्णे यांनी व्यक्त केला. केंद्र आणि राज्यातील सत्ताधारी पक्ष नगरपरिषदेतही एकत्र आल्याने शासनाच्या विविध योजनांचा लाभ शिरूर शहराला मिळवून देणे, विकासकामांसाठी निधी उपलब्ध करणे आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावणे, ही या नव्या राजकीय समीकरणाची प्रमुख आव्हाने असणार आहेत. शहरातील मूलभूत सुविधांचा प्रश्न सोडवून नागरिकांना दिलासा देण्यात ही एकजूट कितपत यशस्वी ठरते, हे आगामी काळात स्पष्ट होईल. दरम्यान, या घडामोडीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरदचंद्र पवार गटाचे उपनगराध्यक्ष आणि नगरसेवक अनुपस्थित असल्याने त्यांच्या भूमिकेबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.त्यांच्या अनुपस्थितीमागील कारण स्पष्ट झालेले नसल्याने त्याबाबत तर्कवितर्कांना अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. एकीकडे विकासाच्या मुद्द्यावर नव्या राजकीय समीकरणाची बांधणी होत असताना, दुसरीकडे या बदलाचा नगरपरिषदेच्या कारभारावर आणि शिरूरच्या आगामी राजकारणावर काय परिणाम होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते कि, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही वैशाली आनंद अहिरे, दिपाली नारायण कांबळे, सुंदराबाई नारायण कांबळे सर्व रा. इंदिरा नगर, सिद्धार्त नगर, चेंबूर ईस्ट, मुंबई, व रेश्मा शामराव जाधव रा. सिद्धार्त कॉलनी, शुद्दोधन नगर, चेंबूर, मुंबई यांचे वडिलोपार्जित सामाईक मालकीहक्क व ताबे वहिवाटीची असून सदर मिळकत त्यांनी आमचे अशिल यांना खरेदी देण्याचे निश्चित केले आहे व तसा आमचे अशिलांकडून विसार रक्कम रु २५,०००/- (अक्षरी रक्कम रु पंचवीस हजार फक्त) स्विकारलेला आहे तसेच सदर मिळकत पुर्णतः निर्वेध व निजोखमी असलेचा संपुर्ण भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कर्ज, गहान, दान, लिज, लिन, बक्षिस, विसारपावती अगर तत्सम स्वरूपाचा बोजा असलेस ही नोटीस जाहीर झालेपासुन ७ (सात) दिवसांचे आत मुळ कागदपत्रानीशी वरील पत्यावर समक्ष भेटुन लेखी हरकत दयावी अन्यथा आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. परिशिष्ट मे. दु. नि. केडगांव/दौंड यांचे हद्दीतील गाव मौजे केडगांव, ता. दौंड, जि. पुणे येथील गट नंबर ९६ मधील ०० हे ०७.५० आर अधिक पो ख ०० है ०३ आर असे एकूण ०० हे १०.५० आर क्षेत्र यासी चतुर्सिमा सरकारी रेकोर्डप्रमाणे

सदर मिळकत या पेपर नोटीसचा विषय असे.
दिनांक: २२/०७/२०२६
वैशाली आनंद आहरे
ॲड. अमित दत्तात्रय शिवरकर
ॲडव्होकेट
दिपाली नारायण कांबळे
रेश्मा श्यामराव जाधव

ॲड. अमित दत्तात्रय शिवरकर
बी.ए.एलएल.बी
ऑफीस पत्ता - ऑफिस क्र. १४, खरेदी - विक्री संघ
बिल्डींग, बोरीपार्धी, ता.दौंड, जि.पुणे ४१२२०३ मो. नं. ९७६५७१४५०८/८२०८१८२७००

जामखेडच्या मल्लखांबपटूंचा पुणे विभागात डंका!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



जामखेड : पुणे विभागीय शालेय मल्लखांब क्रीडा स्पर्धेत जामखेडच्या श्री शंभुसूर्य मर्दानी खेळ प्रशिक्षण संस्थेच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत जामखेडच्या क्रीडा क्षेत्राचा नावलौकिक वाढवला आहे. कु. ज्ञानेश्वरी नितीन धनवे आणि चि. रितेश संतोष खुपसे यांनी आपापल्या वयोगटांत तृतीय क्रमांक पटकावत ठाणे येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. या यशामुळे जामखेडच्या क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दि. २४ ऑक्टोबर ते दि. २५ ऑक्टोबर या कालावधीत अहिल्यानगर येथील वाडिया पार्क क्रीडा संकुलात पुणे विभागीय शालेय मल्लखांब क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत पुणे शहर, पुणे ग्रामीण, पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड, सोलापूर शहर, सोलापूर ग्रामीण, अहिल्यानगर शहर आणि अहिल्यानगर ग्रामीण अशा एकूण आठ संघांनी सहभाग नोंदवला होता. विविध संघांतील खेळाडूंनी कौशल्यपूर्ण सादरीकरण करत स्पर्धेत रंगत आणली.

या स्पर्धेत मुलींच्या १७ वर्षांखालील गटात कु. ज्ञानेश्वरी नितीन धनवे हिने तृतीय क्रमांक मिळवला. तर मुलांच्या १९ वर्षांखालील गटात चि. रितेश संतोष खुपसे याने तृतीय क्रमांक पटकावला. दोन्ही खेळाडूंनी सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि कौशल्याच्या जोरावर हे यश संपादन केले. त्यांच्या या कामगिरीमुळे श्री शंभुसूर्य मर्दानी खेळ प्रशिक्षण संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

ज्ञानेश्वरी धनवे आणि रितेश खुपसे यांची दि. ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत ठाणे (पूर्व) येथील तालुका क्रीडा संकुल, कोपरी येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विभागीय स्तरावरील यशानंतर आता राज्यस्तरावरही उत्कृष्ट कामगिरी करण्याची संधी या खेळाडूंना मिळणार आहे. त्यांच्या या निवडीमुळे जामखेडच्या मल्लखांब क्षेत्रातील खेळाडूंना नवी प्रेरणा मिळाली आहे. या दोन्ही खेळाडूंना बबलू (वस्ताद) टेकाळे, होनाजी गोडळकर, निलेश कुलकर्णी, अमित जिनसीवाले आणि अमोल निमोणकर यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष राजुदादा भांबे, आकाश टेकाळे, अमन भैसडे, किरण राऊत तसेच अहिल्यानगर जिल्हा मल्लखांब संघटनेचे अध्यक्ष नंदेश शिंदे, उपाध्यक्ष अनंत रीसे सर आणि जामखेड तालुका मल्लखांब असोसिएशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले.

सिना धरणात पाण्याची पातळी खालावली

मिरजगावची पाणी योजना संकटात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

मिरजगाव शहरातील नागरिकांना आवाहन !

सिना धरणातील पाणीसाठा पुढील आठ महिने पिण्याकरिता वापराचा आहे. नागरिकांनी पाणी जपून वापरावे व पाण्याचा अपव्यय टाळावा. गरजेपुरतेच पाणी घ्यावे, नळ सुरू ठेवून पाणी वाया घालवू नका, नवीन बांधकाम करणे टाळावे, विनाकारण गाड्या धुण्याकरिता पाण्याचा वापर बंद करावा, पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

विजयकुमार बनाते



मिरजगाव : कर्जत तालुक्यातील मिरजगाव परिसरामध्ये यंदाच्या वर्षी पावसाचे प्रमाण अनपेक्षित पणे राहिल्यामुळे आणि परतीच्या पावसाने दगा दिल्याने त्यातच ऑक्टोबर महिन्यातील तीव्र उष्णतेमुळे धरणामधील पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होत आहे.

यामुळे पिण्याच्या पाण्याच्या आणि सिंचनाच्या योजनावर मोठ्या ताण निर्माण झाला आहे. मुख्य धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाणी पातळी कमालीची खलावली असल्याने धरणातील जिवंत पाणी साठा झपाट्याने कमी होत असल्याने या धरणावर अवलंबून असलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत आता पूर्णपणे संकटात सापडले आहे. धरणाच्या फुगीर क्षेत्रातून विहिरी आणि जॅक वेलद्वारे होणारा पाणी उपसा विस्कळीत झाला असून ऐन हिवाळ्याच्या तोंडावर गावाला तीव्र पाणी टंचाईला सामना करावा लागण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पाणी खूप मागे गेल्यामुळे मुख्य जलवाहिनीच्या विहिरींनी जॅकवेलद्वारे होणारा पाणी उपसा विस्कळीत होत असून मुख्य जलवाहिनीच्या विहिरीने जॅकवेल तळ गाठला आहे. मोटर पंपला पुरेशी पाणी मिळत नसल्याने पाणी उपसा करताना तांत्रिक अडचणी येत आहेत परिणामी गावच्या पाणीपुरवठा सातत्याने विस्कळीत होत असून प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची स्रोत आटत चालले आहे. भूजल पातळीत मोठी घट होत असताना धरण पाणलोट क्षेत्रात दिवसेंदिवस पाणीसाठा कमी होत असल्याने आज मितीला धरणामध्ये अल्पशा प्रमाणात पाणी साठा असल्याने धरण पांणलोट क्षेत्रांत गाळाचे प्रमाण जास्त प्रमाणात दिसत आहे. तर जलसंपदा आणि ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पाणी नियोजन करणे गरजेचे असल्याचे सामान्य नागरिकांमधून बोलले जाते आहे. सीना डॅम येथील मिरजगांव पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेल पर्यंतच्या चारीतील पाणी संपल्याने २५० फूट अंतरावर नव्याने १० hp चे दोन पम्प टाकून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचं काम ग्रामपंचायत कर्मचारी करत आहेत.

द•ख•ल

पाथर्डीच्या युवराज सातकरची राज्यस्तरीय कुस्तीत दमदार बाजी



पाथर्डी शहर : जिद्द, मेहनत, चिकाटी आणि कुस्तीच्या आखाड्यातील कौशल्याच्या जोरावर पाथर्डीच्या युवराज पंडित सातकर याने राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयात बारावी विज्ञान शाखेत शिक्षण घेणाऱ्या युवराजने ६७ किलो वजन गटात प्रथम क्रमांक पटकावत आपल्या यशाचा झेंडा फडकवला. या दमदार कामगिरीच्या बळावर त्याची हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. युवराजच्या या यशामुळे पाथर्डीच्या शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर आणि जिल्हा क्रीडा परिषद, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने नेवासा येथील त्रिमूर्तीनगरमधील घाडगे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. या स्पर्धेत युवराज सातकर याने आपल्या कुस्तीतील कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन करत ६७ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवला. राज्यस्तरावरील या यशामुळे त्याला आता राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्याची महत्त्वपूर्ण संधी मिळाली आहे. त्याच्या यशामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे. युवराजच्या या निवडीमुळे त्याच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी नवी दिशा मिळाली असून, त्याच्या कामगिरीकडे पाथर्डी तालुक्यातील क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

रोहित घोडेस्वार सरांच्या शैक्षणिक कार्याची राज्यस्तरावर दखल!



पाथर्डी शहर : विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवून त्यांना प्रयोगशील शिक्षणाची गोडी लावणारे ल. ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विज्ञान शिक्षक रोहित कुमार घोडेस्वार यांना बी द चेंज फाउंडेशन, शिर्डी यांच्या वतीने दिला जाणारा 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६' रविवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी प्रदान करण्यात आला. त्यांच्या नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांची दखल घेत झालेल्या या गौरवामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. घोडेस्वार सर यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान केवळ पुस्तकातून न शिकवता प्रत्यक्ष प्रयोग, शैक्षणिक उपकरणे आणि विज्ञान प्रतिकृतींच्या माध्यमातून शिकवण्यावर भर दिला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती आणि आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाविषयी कुतूहल निर्माण होत आहे.

आई-वडिलांच्या कष्टाचे चीज करा : विलास बडे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अमरापुर : आजच्या तरुण पिढीला सर्व काही झटपट हवे आहे. मात्र, आयुष्यात कोणतेही यश सहजासहजी मिळत नाही. त्यासाठी संघर्ष करावा लागतो, परिस्थितीशी दोन हात करावे लागतात. तासन्तास मोबाईलवर रिल्स पाहून भविष्य घडणार नाही. आपल्या शिक्षणासाठी आई-वडिलांनी केलेल्या कष्टांची जाणीव ठेवा. विशेषतः आपल्या शिक्षणासाठी राबणाऱ्या बापाला आयुष्यात कधीही हरू देऊ नका. त्याच्या कष्टाचे चीज करण्यासाठी मेहनत करा, असे भावनिक आणि प्रेरणादायी आवाहन विलास बडे यांनी केले.

केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित ढाकणे शैक्षणिक संकुल, राक्षी येथे संस्थेच्या प्रेरणास्थान कै. सौ. सुनीताताई ढाकणे यांच्या २२ व्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित प्रेरणादिन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. एकनाथराव ढाकणे होते. यावेळी रविकांत तुपकर, गौरव देहाडे, डॉ. तुकाराम नेहरकर, डॉ. सोमनाथ बडे, हृषीकेश ढाकणे, जया रहाणे-ढाकणे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

आपल्या प्रभावी व्याख्यानातून विलास बडे यांनी विद्यार्थ्यांना वास्तवाचे भान करून दिले. आज मोबाईलच्या आहारी गेलेल्या तरुणाईने आपल्या भविष्याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. आयुष्यात मोठे व्हायचे असेल तर संघर्षाला पर्याय नाही. आई-वडील आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी किती खस्ता खातात, किती संकटे सहन करतात, याची जाणीव प्रत्येक विद्यार्थ्याने ठेवली पाहिजे. केवळ स्वप्ने पाहून यश मिळत नाही, तर ती पूर्ण करण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रम आवश्यक आहेत. आपल्या आई-वडिलांनी पाहिलेली स्वप्ने पूर्ण करण्याची जबाबदारी तरुण पिढीने स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले.अध्यक्षीय भाषणात डॉ. एकनाथर ढाकणे यांनी संस्थेच्या उभारणीमागील संघर्षाचा आढावा घेतला. ग्रामीण भागातील गरीब व सर्वसामान्य कुटुंबांतील मुला-मुलींना उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, या उद्देशाने अत्यंत माफक शुल्कात शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. मराठा, ओबीसी तसेच इतर समाजघटकांतील पात्र विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे या संकुलातून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज शासकीय, निमशासकीय तसेच विविध क्षेत्रांत जबाबदारीने कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे, हेच संस्थेचे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

मिरजगावात अरिहंत पतसंस्थेकडून ८०० सभासदांना दिवाळी भेट!



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

मिरजगाव : कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे अरिहंत ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, मिरजगाव या संस्थेच्या वतीने दिपावली सणाच्या पूर्वसंध्येला दरवर्षी प्रमाणे दिपावलीनिमित्त तब्बल ८०० सभासद - ठेवीदारांना दिवाळी गिफ्ट म्हणून आकर्षक अशी भेटवस्तू व मिठाईचे बॉक्स संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पंकज इंद्रकुमार धोंगडे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

या प्रसंगी संस्थेचे व्हाईस चेअरमन विकास पवळ, संचालक सतीश धोंगडे, जनरल मॅनेजर जालिंदर सकट, मॅनेजर लतीफ तांबोळी, स्वाती पवळ, ताई सकट, धनश्री विधाते,अमोल सकट, अनिकेत वामन, आदित्य वामन, गणेश उल्हारे, अंजली सकट, अक्षय पाचरणे, सुरज पाचरणे, कलेक्शन एजंट गणेश नलवडे, अरविंद झांबरे, अजिनाथ शिंदे, प्रवीण पंडित, राजु गदादे, राजश्री खाववे, सुधीर एखंडे, अमोल कापरे, चंद्रकांत शेलार, संस्कार शेलार यांच्यासह कलेक्शन एजंट, स्टाफ, ठेवीदार, सभासद, सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

अरिहंत पतसंस्था ही मिरजगाव परिसरात सभासदांना दिपावली सणानिमित्त वस्तू भेट देणारी पहिली संस्था ठरली आहे. या पतसंस्थेने सामाजिक बांधिलकी कायमच राखली असून संस्थेच्या मंगळवेढा शाखेत देखील हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे. या स्तुत्य उपक्रमामुळे सभासद ठेवीदारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे..

यावेळी संस्थेचे अध्यक्ष पंकज धोंगडे म्हणाले, अरिहंत पतसंस्था ही सभासदांना व्यवसाय उभे करण्यासाठी पाठबळ देण्याबरोबरच इतरही सामाजिक कार्यात संस्था नेहमी अग्रेसर राहिली आहे. ठेवीदारांनी दाखविलेल्या विश्वासामुळे संस्थेने अल्पावधीतच मोठे नावलौकिक संपादन केले आहे. सभासदांना दिवाळी भेटवस्तू देण्याची ही परंपरा यापुढे कायम ठेवण्यात येईल. यंदाची देखील दिवाळी अत्यंत आनंदमयी व उत्साहाची जावी म्हणून सभासदांना दिवाळी भेट देण्याचा निर्णय संस्थेने घेतला. पतसंस्था बँकींग क्षेत्रात उल्लेखनीय काम करत असताना सभासदांच्या हिताकडे लक्ष देईल, असे त्यांनी सांगितले.

लोकसहभागातून बदललेल्या २३ शाळांचा 'बेस्ट स्कूल, बेस्ट लीडर' पुरस्काराने सन्मान!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा : गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि लोकसहभागातून शाळांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने अग्रीपंख फाउंडेशनच्या वतीने लोणीव्यंकनाथ येथे आयोजित शिक्षक प्रेरणा सोहळ्यात श्रीगोंदा तालुक्यातील लोकसहभागातून बदल घडविणाऱ्या १५ प्राथमिक शाळा आणि ८ विद्यालयांचा 'बेस्ट स्कूल, बेस्ट लीडर' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. शिक्षण, संस्कार, वाचनसंस्कृती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी योगदान देणाऱ्या शिक्षकांना या सोहळ्यातून प्रेरणा देण्यात आली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पुणे विभागाचे आयकर आयुक्त डॉ. नितीन वाघमोडे, दीपस्तंभ फाउंडेशनचे यजुर्वेद महाजन आणि उद्योजक प्रकाश कुतवळ यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

'शिक्षक राष्ट्रप्रगतीचे मानबिंदू' या विषयावर विचार मांडताना यजुर्वेद महाजन म्हणाले, शिक्षक हा समाजातील सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. शिक्षकांनी आपल्या कर्तव्यनिष्ठेची मोहर उमटवली, तर राष्ट्राची प्रगती निश्चितच अधिक वेगाने होऊ शकते. विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याची मोठी जबाबदारी शिक्षकांच्या खांद्यावर असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

'वाचनसंस्कृतीचे जतन करू या' या विषयावर बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी पुस्तक वाचनाचे प्रमाण कमी होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी जाणीवपूर्वक आणि मनापासून प्रयत्न करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संध्या गायकवाड, राणी फराटे, कुसुमकुमारी कानडी, विजय त्रिंबके, मधुकर राहणे, दत्तात्रय गावडे, प्रा. संजय लाकुड झोडे, शिवदास शिंदे, प्रमिला इथापे, किसन वऱ्हाडे, अंकुश घाडगे, डॉ. संतोष ओव्हळ, माऊली कुरुडळे यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

श्री भैरवनाथ सेवा मंडळाला दुर्गामाता मित्र मंडळाचा 'ग्रामभूषण' पुरस्कार



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

पारनेर : पारनेरचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ देवस्थानच्या धार्मिक व सामाजिक कार्यात मोलाचे योगदान देणाऱ्या श्री भैरवनाथ सेवा मंडळाला दुर्गामाता मित्र मंडळाच्या वतीने यंदाचा 'ग्रामभूषण' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ४४ वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेल्या दुर्गामाता मित्र मंडळाने सेवा मंडळाच्या निःस्वार्थ कार्याची दखल घेत हा सन्मान केला.

श्री भैरवनाथ सेवा मंडळ देवस्थानच्या व्यवस्थापनासह विविध धार्मिक उपक्रमांच्या नियोजनात सातत्याने पुढाकार घेत आहे. लोकवर्गणीतून देवस्थानचा जीर्णोद्धार, काळभैरव जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन, भक्तीपंढरीचे नियोजन आणि दरवर्षीच्या यात्रोत्सवाचे नेटके व्यवस्थापन अशा विविध माध्यमांतून मंडळ धार्मिक परंपरा जपण्याचे काम करीत आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या सुवर्णमहोत्सवी भक्तीपंढरीच्या नियोजनातही मंडळाचे कार्यकर्ते तन, मन आणि धनाने योगदान देत आहेत.

आ. दाते यांच्या हस्ते गौरव

केवळ श्री भैरवनाथ देवस्थानपुरते मर्यादित न राहता पारनेर शहरातील इतर देवस्थानांच्या जीर्णोद्धारासाठीही मंडळाने पुढाकार घेतला आहे. धार्मिक कार्यासोबत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या कार्याची दखल घेत दुर्गामाता मित्र मंडळाने श्री भैरवनाथ सेवा मंडळाला 'ग्रामभूषण' पुरस्काराने सन्मानित केले.

यावेळी श्री भैरवनाथ देवस्थान मंडळाचे ह. भ. प. सचिन महाराज शेटे यांनी दुर्गामाता मित्र मंडळाच्या सामाजिक जाणिवेचे कौतुक केले. श्री भैरवनाथ सेवा मंडळाच्या कार्याची दखल घेऊन पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

या प्रसंगी आ. काशिनाथ दाते, रमेश अडसूळ, सचिन महाराज शेटे, धोंडीभाऊ पुजारी, वसंत चेडे, संभाजी मगर, ज्ञानदेव औटी यांच्यासह संजय वाघमारे, बबन शेख, शकील शेख, प्रशांत गायकवाड, विठ्ठल औटी, संजीव देशमुख, संदीप देशमुख, विजय डोळ, ड. गणेश कावरे, दादा शेटे, सतीश म्हस्के आदी उपस्थित होते.

कोजागरीच्या चंद्रप्रकाशात रंगली भळंदे यात्रा!

बाजारपेठेतही दुष्काळाच्या सावटाचा यात्रेवर आर्थिक फटका

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



राशीन : कोजागरी पौर्णिमेचा शीतल चंद्रप्रकाश, हलगी-ढोल आणि झांजांचा निनाद, देवीची गाणी गाणारे आराध्यांचे मेळे, त्यावर ठेका धरत नृत्य करणारे जोगती आणि तृतीयपंथीय अशा भक्तिरसाने भारलेल्या वातावरणात राशीन येथील श्री जगदंबा यमाईमातेच्या नवरात्र महोत्सवाची भळंदे यात्रेने उत्साहात सांगता झाली. 'आई साहेबऽऽ उदो उदो!'च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. या अनोख्या धार्मिक सोहळ्याचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

रात्री धूपारतीनंतर मंदिरात भळंदे सोहळ्याला प्रारंभ झाला. पारंपरिक विधी आणि पोत खेळण्याच्या कार्यक्रमानंतर मध्यरात्रीच्या सुमारास भळंदे तयार करण्यात आले. गळा काढलेल्या मातीच्या घागरीत सरकी टाकून त्यावर साडी-चोळी बांगड्या व ओटीभरणाचे साहित्य ठेवण्यात आले. सुती कापडाच्या ज्योती पेटवून देवीसमोर विधिवत पूजन करण्यात आले.

त्यानंतर पेटते भळंदे संदीप पोतदार यांच्या हातावर देण्यात आले. त्यांनी ते हातावर घेतले मंदिराला प्रदक्षिणा घातली. कासवाजवळ आल्यानंतर भाविकांच्या उपस्थितीत घागरीतील पेटत्या ज्वाला पाणी ओतून शमविण्यात आल्या. यानंतर रविराज पाठक यांनी भळंद्यातील साडी-चोळी बांगड्या आणि ओटीभरणाचे साहित्य जसेच्या तसे बाहेर काढले. हा क्षण पाहताच उपस्थित भाविकांनी 'आई साहेबऽऽ!' असा एकच जयघोष केला. रात्री साडेबारा ते एक च्या सुमारास या सोहळ्याची सांगता झाली. श्री जगदंबा यमाईमातेच्या नवरात्र महोत्सवातील विविध धार्मिक कार्यक्रम, धाकट्या पालखीची गावप्रदक्षिणा आणि भळंदे सोहळा यांमुळे राशीन नगरीत भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. भळंदे वेळी देवगावकर बंधूंनी भाविकांना कुंकवाचे वाटप केले.

मोठ्या पालखी सोहळ्यानंतर निद्राधीन झालेल्या यमाई व तुकाई मातेला पौर्णिमेच्या पहाटे पुजाऱ्यांनी 'आई साहेबऽऽ!' अशी आरोळी देत जागृत केले. त्यानंतर देवीला अभिषेक घालून विधिवत पूजा करण्यात आली.

नवरात्र महोत्सव आणि भळंदे यात्रेनिमित्त राशीनच्या बाजारपेठेत भाविकांची वर्दळ वाढली होती. विविध दुकाने, पूजेचे साहित्य आणि यात्रेतील व्यावसायिक बाजारपेठेत दुष्काळाच्या सावट मुळे बळीराजा अडचणीत आल्यामुळेआर्थिक उलाढाल मंदावली. धार्मिक श्रद्धा, पारंपरिक विधी आणि यात्रेचा उत्साह यांचा सुंदर संगम घडवणाऱ्या भळंदे सोहळ्याने राशीनच्या आणि धार्मिक परंपरेचे भाविकांना दर्शन घडवले. शारदीय नवरात्र उत्सव वाची सांगता कोजागिरी पौर्णिमेच्या भाळदे नि शारदीय नवरात्र उत्सव वाची सांगता झाली.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

मंगळवार, दि.२७ ऑक्टोबर २०२६ । पान ८

सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षपदी जिजाराम डोके

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : श्रीगोंदा तालुक्यातील आढळगाव येथील सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षपदी जिजाराम डोके, तर उपाध्यक्षपदी हरिश्चंद्र गव्हाणे यांची निवड करण्यात आली. सचिवपदी गणेश गाढवे आणि खजिनदारपदी पांडुरंग बोळगे यांची सर्वानुमते निवड झाली. जिल्हा धर्मादाय उपआयुक्तांच्या आदेशानुसार झालेल्या देवस्थान ट्रस्टच्या निवडणुकीत खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष शरद जमदाडे, उत्तमराव राऊत, संस्थापक अध्यक्ष नानासाहेब बोळगे आणि देवराव पाटील यांच्या नेतृत्वाखालील ग्रामदैवत विकास मंडळाने सर्व २५ जागांवर विजय मिळवून निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले होते. सोमवारी (दि. २६) सिद्धेश्वर मंदिरात झालेल्या बैठकीत विश्वस्त शरद शिंदे यांनी मांडलेल्या सूचनेनुसार पोपटराव जमदाडे यांची बैठकीच्या अध्यक्षस्थानी निवड करण्यात आली. त्यानंतर ठरावानुसार अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि खजिनदार या पदांवरील निवडी सर्वानुमते करण्यात आल्या. निवडीनंतर शरद जमदाडे, नानासाहेब बोळगे, उत्तमराव राऊत, गणेश शिंदे, सुनील शिंदे, देवराव पाटील, लक्ष्मण वाकडे, रामभाऊ झेंडे, शिवदास शिंदे, डॉ. अशोक वाकडे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. या निवडीमुळे देवस्थान ट्रस्टच्या कारभाराची जबाबदारी नव्या पदाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहे.

वैद्यकीय शिक्षणात तंत्रज्ञानासोबत सेवाभाव आणि मानवी मूल्ये जपा!

पद्मभूषण डॉ. दत्तात्रेयुडू नोरी यांचा विद्यार्थ्यांना संदेश । विखे पाटील विद्यापीठाच्या पहिल्या बॅचचा स्वागत समारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान आणि आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानामुळे आरोग्यसेवेच्या क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. भविष्यात रोगांचे अचूक निदान, वैयक्तिक गरजांनुसार उपचार आणि उपचारपद्धतींचे अधिक प्रभावी नियोजन शक्य होणार आहे. मात्र, या प्रगतीसोबत डॉक्टरांनी सहानुभूती, सेवाभाव, नम्रता आणि मानवी मूल्यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कर्करोगतज्ज्ञ पद्मभूषण डॉ. दत्तात्रेयुडू नोरी यांनी केले. प्रत्येक वैद्यकीय अहवालामागे एका रुग्णाचे जीवन, त्याच्या कुटुंबाच्या आशा आणि भविष्य दडलेले असते. त्यामुळे अहवाल, तपासण्या आणि तंत्रज्ञानाच्या आधारे उपचार करताना रुग्णाची मानसिक अवस्था, त्याची जीवनकहाणी आणि कुटुंबीयांच्या भावनांकडेही डॉक्टरांनी संवेदनशीलतेने पाहिले पाहिजे. तंत्रज्ञान हे उपचारांचे प्रभावी साधन आहे; मात्र रुग्णाशी माणुसकीने संवाद साधणे आणि त्याला मानसिक आधार देणे ही डॉक्टरांची तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

पद्मश्री डॉ. विखे पाटील फाउंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएसच्या २३ व्या तुकडीतील विद्यार्थी तसेच नव्याने स्थापन झालेल्या लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील विद्यापीठाच्या पहिल्या तुकडीतील विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात डॉ. नोरी बोलत होते. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मोहन खामगावकर, डॉ. दिलीप म्हैसेकर, डॉ. विष्णू मगरे यांच्यासह वैद्यकीय,



शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांच्या भावी शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

डॉ. नोरी म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान, जनुकीय माहितीचे विश्लेषण आणि डिजिटल आरोग्यसेवा यामुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठ्या संधी निर्माण होत आहेत. रुग्णाच्या आजाराचे स्वरूप, त्याची आनुवंशिक पार्श्वभूमी आणि उपचारांना मिळणारा प्रतिसाद यांचा अभ्यास करून भविष्यात अधिक अचूक आणि परिणामकारक उपचार करणे शक्य होईल. मात्र, तंत्रज्ञानाच्या अतिरेकी वापरामुळे डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील मानवी संवाद कमी होता कामा नये. रुग्णाला केवळ एक वैद्यकीय केस किंवा अहवाल म्हणून न पाहता, त्याच्या वेदना आणि भावनांचा आदर करणे आवश्यक आहे. गरजू आणि वंचित रुग्णांना सेवा देणे हे डॉक्टरांचे खरे कर्तव्य आहे. सेवा करणारे हात हे प्रार्थना करणाऱ्या ओठांपेक्षाही पवित्र असतात, असे सांगत डॉ. नोरी यांनी विद्यार्थ्यांना निःस्वार्थ सेवाभावाचा संदेश दिला. वैद्यकीय शिक्षण घेताना ज्ञान आणि कौशल्याबरोबरच संयम, शिस्त, नैतिकता आणि समाजाप्रती बांधिलकी विकसित करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

जलसंपदामंत्री तथा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी विद्यापीठाच्या पहिल्या तुकडीचा स्वागत समारंभ संस्थेसाठी ऐतिहासिक क्षण असल्याचे सांगितले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या २३ वर्षांच्या प्रवासानंतर विद्यापीठाचे स्वप्न साकार झाले असून, या संस्थेतून गुणवत्तापूर्ण आणि समाजाभिमुख वैद्यकीय शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा, संशोधनाच्या संधी आणि व्यावहारिक प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी, प्रशासकीय प्रश्न आणि आवश्यक मार्गदर्शनासाठी लवकरच स्वतंत्र मदतसेवा सुरू करण्यात येणार असल्याची घोषणाही डॉ. विखे पाटील यांनी केली. विद्यार्थ्यांनी उपलब्ध संधींचा उपयोग करून केवळ स्वतःच्या प्रगतीपुरते मर्यादित न राहता समाजातील गरजू घटकांसाठी काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. नोरी यांनी भारताशी असलेले आपले भावनिक नाते व्यक्त करताना शिर्डीच्या साईबाबांवरील श्रद्धा ही आपल्या कार्याची प्रेरणा असल्याचे सांगितले. निःस्वार्थ सेवा, नम्रता, प्रामाणिकपणा आणि सर्वांप्रती प्रेम हीच आपल्या जीवनाची मूलभूत मूल्ये असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी वैद्यकीय क्षेत्रात यश मिळविताना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा संकल्प करावा, असा संदेश देत त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.

टाकळी ढोकेश्वरमध्ये भरदिवसा घरफोडी : १० तोळे सोने लांबवले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

टाकळी ढोकेश्वर : पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे रविवार दि. २५ रोजी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास मंगल बाळासाहेब गोरडे (रा.बायपास रोड टाकळी ढोकेश्वर) यांच्या घरी ही चोरीची घटना घडली.



या घटनेची सविस्तर माहिती अशी की, मंगल गोरडे सकाळी घरातील काम आटोपून घराला कुलुप लाऊन शेतात गेल्या असता दुपारी १ वाजण्याच्या सुमारास ३ चोरट्यांनी घराचे कुलुप तोडून घराची उचकापाचक करून आतील कपाटात ठेवलेले मंगळसूत्र,बोरमाळ,नेकलेस,बांगड या,डोरले,शिंपले, आदी १० तोळे वजनाचे सोन्याचे दागीने अंदाजे किंमत रू.३,०९,०००/- चोरून नेले.भर दुपारच्या वेळी चोरट्यांनी घराला लक्ष्य करून मौल्यवान ऐवज चोरून नेल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.काही महिन्यांपूर्वी याच परिसरात एका घरात दुपारच्या वेळी चोरी झाल्याचा प्रकार घडला होता. मागील चोरीतील आरोपी व मुद्देमाल अजूनही पोलिसांना सापडला नाही तोच आता पुन्हा त्याच परिसरात भरदिवसा चोरी झाल्याने नागरिक भयभीत झाले आहेत.चोरट्यांना दिवसाढवळ्या घरफोडी करण्याचे धाडस कसे होते, असा सवाल उपस्थित होत आहे.चोरी केल्यानंतर चोरटे ढोकेश्वर रस्त्याने फरार झाले. घटनेची माहिती मिळताच पारनेर व टाकळी ढोकेश्वर पोलीस यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवला. यावेळी आणलेल्या डॉग स्कॉडने रस्त्यापर्यंत माग काढला पण चोरटे मोटारसायकलने गेल्याने पुढे माग काढता आला नाही.यावेळी ठसे तज्ञांनी भेट देऊन ठसे शोधण्याचा प्रयत्न केला.

एकाच परिसरात काही महिन्यांच्या अंतराने भरदिवसा चोरीच्या घटना घडत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी या दोन्ही घटनांचा परस्पर संबंध आहे का याचीही तपासणी करावी आणि चोरट्यांना तातडीने जेरबंद करावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

पाच कोटींच्या बोनसने काळे कारखान्यातील कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

आ. आशुतोष काळे यांचा २० टक्के बोनस देण्याचा निर्णय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : वर्षभर घाम गाळून कारखान्याच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याने यंदा २० टक्के बोनस देण्याचा निर्णय घेतला आहे. कारखान्याचे अध्यक्ष आ. आशुतोष काळे यांनी जाहीर केलेल्या या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. बोनसपोटी सुमारे साडेपाच कोटी रुपये कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यांत जमा होणार असून, त्यातून सणासुदीच्या काळात स्थानिक बाजारपेठेलाही आर्थिक चालना मिळणार आहे.

कारखान्याचे संस्थापक माजी खासदार स्व. कर्मवीर शंकरराव काळे यांनी कामगारांचे हित जपण्याची परंपरा सुरू केली. माजी आ. अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही परंपरा पुढे सुरू ठेवत आ. आशुतोष काळे यांनी यंदाही कर्मचाऱ्यांना एकरकमी २० टक्के बोनस देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे घरातील दिवाळीचा खर्च, मुलांचे कपडे, फराळ आणि इतर सणासुदीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कर्मचाऱ्यांना आर्थिक आधार मिळणार आहे. कारखाना व्यवस्थापनाने कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीच्या करारानुसार ५० टक्के फरकाची रक्कम ऑगस्टमध्ये अदा केली आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही पहिल्या उचलीनंतर अतिरिक्त ऊसबिलाची रक्कम देण्यात आली आहे. शेतकरी आणि कर्मचारी या दोन्ही घटकांच्या हिताला प्राधान्य देण्याची भूमिका व्यवस्थापनाने घेतली आहे.

बोनसची रक्कम बाजारात आल्याने किराणा दुकाने, कपड्यांची दुकाने आणि अन्य व्यावसायिकांच्या उलाढालीत वाढ होण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, कर्मचाऱ्यांच्या वतीने युनियनचे जनरल सेक्रेटरी नितीन गुरसळ आणि सेक्रेटरी प्रकाश आवारे यांनी आमदार आशुतोष काळे यांचा सत्कार करून आभार मानले. यावेळी कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनील कोल्हे आणि अन्य अधिकारी उपस्थित होते.

घोडेगाव येथे कांद्याला साडेपाच हजार रुपये भाव

नवीन लाल कांद्याची आवक वाढली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

घोडेगाव : नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घोडेगाव येथील उपबाजारात सोमवार (दि.२६) रोजी झालेल्या लिलावात सरासरी ४२ ते ४५ रुपये भाव मिळाला तर उत्तम प्रतीच्या जुन्या कांद्याच्या एक अर्ध्या वकल साठी ५५ रुपये प्रति किलोचा भाव तर नवीन कांद्याला साठ रुपये प्रति किलो भाव मिळाल्याची माहिती कांदा आडतदार पांडुरंग ताके यांनी दिली.

सोमवार रोजी आवारात २० हजार चारशे ३८ गोण्यांची आवक झाली होती यात एक नंबर गोळा मालास ४८ ते ५२ रुपये प्रति किलो दोन नंबर मालास ४३ ते ४५ रुपये भाव मिळाला तर तीन नंबर मालास ३० ते ३५ रुपये भाव मिळाला आहे यात नविन लाल कांद्याला सरासरी ४५ ते ५० रुपये भाव मिळाला.

"यावर्षी पाऊस कमी झाल्याने तसेच दक्षिण भारतातील नवीन लाल कांदा बाजारात येण्याचे प्रमाण कमी झाल्याने महाराष्ट्रातील नवीन लाल कांद्याला यापुढील काळात चांगले दर मिळू शकतात.

(भारत जाधव, कांदा आडतदार घोडेगाव)

"यावर्षी दूषित हवामानामुळे नवीन लाल कांद्याची हवीतशी साईज झाली नाही तसेच कांद्याच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट झाली असून दर समाधानकारक मिळत असल्याने उत्पादन खर्च निघत आहे.

(अशोक निकम, कांदा उत्पादक शेतकरी देवगाव)

रग्बीच्या रणांगणात समताचा डंका!

राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्यपदकाची कमाई



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : जिद्द, चिकाटी आणि संघभावनेच्या जोरावर समता इंटरनॅशनल स्कूलच्या १७ वर्षांखालील मुलांच्या रग्बी संघाने राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्यपदक पटकावले.

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथील एस.व्ही.जे.सी.टी. स्पोर्ट्स अकॅडमी, डेरवण येथे झालेल्या या स्पर्धेत समताच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली आणि शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला.

स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात समताच्या संघाने मुंबईच्या संघावर १८-० असा एकतर्फी विजय मिळवला. प्रतिस्पर्धी संघाला एकही गुण मिळवू न देता मिळवलेल्या या विजयातून समताच्या खेळाडूंचे वर्चस्व स्पष्ट झाले.

त्यानंतर नाशिकच्या संघाला १२-५ असे पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या संघाविरुद्ध खेळाडूंनी जोरदार लढत दिली. मात्र, विजेतेपदाने हुलकावणी दिल्याने संघाला द्वितीय स्थानावर समाधान मानावे लागले. आक्रमक खेळ, चपळाई, भक्कम बचाव आणि सांघिक समन्वयाच्या बळावर समताच्या खेळाडूंनी राज्यस्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली.

या यशाबद्दल संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडाक्षेत्रातील प्रावीण्यालाही संस्थेत महत्त्व दिले जाते, असे त्यांनी सांगितले. खेळामुळे शिस्त, नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि संघभावना विकसित होते.

समताच्या खेळाडूंनी दाखवलेली जिद्द आणि संघर्षवृत्ती कौतुकास्पद असून, भविष्यात ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही शाळेचा नावलौकिक वाढवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

किरकोळ करणातून वडील व मुलीला मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : तुमच्या मुलांनी आमचे घरावर दगड का मारले, असे विचारले असता आरोपीने वडिल व मुलीला शिवीगाळ दमदाटी करुन लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. ही घटना राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे दि. २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी घडली. गणेश सुखदेव पवार, वय ४२ वर्षे, रा. वांबोरी, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजे दरम्यान गणेश पवार हे कामावरून गेले होते. त्यावेळी त्यांच्या मुलीने त्यांना सांगीतले की, आपले घरावर हर्षद गोरक्षनाथ पवार, कृष्णा गोरक्षनाथ पवार यांनी दगड मारले व लाईटची वायर तोडली. तसेच शिवीगाळ दमदाटी केली. तेव्हा गणेश पवार यांनी गोरक्षनाथ पवार यांना फोन करुन घरासमोर बोलावले. तेथे गोरक्षनाथ पवार, हर्षद गाळे रक्षनाथ पवार, कृष्णा गोरक्षनाथज्ञ पवार, सविता गोरक्षनाथ पवार हे आले. तेव्हा गणेश पवार यांनी त्यांना विचारले की, तुमच्या मुलांनी आमचे घरावर दगड का मारले. असे विचारले आरोपी गोरक्षनाथ पवार याने गणेश पवार व त्यांची मुलगी सई अशा दोघांना शिवीगाळ दमदाटी करुन लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. तसेच तुम्ही जर आमची तक्रार पोलीस स्टेशनला केलीतर आम्ही तुम्हाला जिवंत सोडणार नाही, धमकी दिली. घटनेनंतर गणेश सुखदेव पवार यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी गोरक्षनाथ भाउसाहेब पवार, रा. वांबोरी, ता. राहुरी, याच्यावर गुन्हा रजि. नं. ११९०/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

स्मशानभूमीत अभ्यासाची वेळ; स्पर्धा परीक्षार्थींच्या व्यथा प्रशासनासमोर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा : पोलीस भरतीतील कथित अनियमितता, पेपरफुटी, ऑनलाइन परीक्षांमधील गैरप्रकार, एमपीएससीतील रिक्त पदे आणि भरती प्रक्रियेतील विलंबामुळे त्रस्त झालेल्या विद्यार्थ्यांनी 'संवाद विद्यार्थ्यांचा, निर्धार न्यायाचा' या कार्यक्रमात आपल्या व्यथा मांडल्या. अभ्यासासाठी पुरेशा सुविधा नसल्याने काही विद्यार्थ्यांना चक्क स्मशानभूमीत बसून अभ्यास करावा लागत असल्याची बाब यावेळी समोर आली. पोलीस भरतीसाठी स्वतंत्र मैदान उपलब्ध करून देण्याच्या मागणीवर महिनाभरात मैदान तयार करण्याचे आश्वासन देण्यात आले.सखी सन्मान फाउंडेशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते विवेकानंद पाटील, आ. हेमंत ओगले, उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार शिरसागर, तहसीलदार सचिन डोंगरे, पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

देवळाली प्रवरा नगरपरिषदेत कथित वजन घोटाळ्याविरोधात बेमुदत उपोषण

कचरा गाडीच्या वजनात फेरफार केल्याचा आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : देवळाली प्रवरा नगरपरिषदेच्या घनकचरा संकलन व वाहतुकीदरम्यान कचरा गाड्यांच्या वजन नोंदींमध्ये कथित फेरफार करून नगरपरिषदेची आर्थिक फसवणूक होत असल्याचा आरोप करत नगरसेवक तुकाराम भिमराज पठारे यांनी सोमवारपासून (दि. २६) नगरपरिषद कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. संबंधित ठेकेदाराचे देयक रोखावे, प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी आणि दोष सिद्ध झाल्यास ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे, अशा मागण्या त्यांनी केल्या आहेत.

नगरसेवक पठारे यांनी १३ ऑक्टोबर रोजी कचरा वाहतूक करणारे वाहन अडवून चालक व कर्मचाऱ्यांकडे विचारपूस केली होती. त्यानंतर त्यांनी



मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दिली. वाहनाचे प्रत्यक्ष वजन वाढवून दाखविण्याच्या सूचना ठेकेदाराकडून दिल्या जात असल्याचा दावा त्यांनी केला आहे. वजनकाट्यावर वजन करताना कर्मचारी वाहनातच बसून राहत असल्याने वजनाच्या नोंदींबाबत संशय निर्माण झाल्याचेही त्यांनी तक्रारीत म्हटले आहे. या प्रकाराचे चित्रीकरण उपलब्ध असल्याचे सांगत त्याची तपासणी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

प्रत्यक्ष संकलित केलेल्या कचऱ्यापेक्षा अधिक वजन दाखवून ठेकेदाराला नगरपरिषदेच्या निधीतून जादा रक्कम अदा करण्यात आली आहे का, याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी वाहनांच्या वजनाच्या पावत्या, एकूण व रिकाम्या वाहनाचे वजन, निव्वळ वजन, वाहन क्रमांक तसेच तारीख व वेळ यांच्या नोंदी तपासाव्यात. वजनकाट्यावरील सीसीटीव्ही चित्रण आणि इलेक्ट्रॉनिक नोंदी सुरक्षित ठेवून त्यांची पडताळणी करावी, असेही पठारे यांनी म्हटले आहे.

चौकशी पूर्ण होईपर्यंत ठेकेदाराची प्रलंबित व पुढील देयके स्थगित करावीत. वाहनचालक, संबंधित कर्मचारी, वजनकाटा कर्मचारी, ठेकेदाराचे प्रतिनिधी आणि नगरपरिषदेतील अधिकारी यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. चुकीच्या नोंदींमुळे जादा रक्कम अदा झाल्याचे निष्पन्न झाल्यास ती वसूल करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, नगरपरिषद क्षेत्रातील सुमारे सहा हजार ५०० घरांचा कचरा संकलित होत असल्याचे कागदोपत्री दाखवले जात असले, तरी प्रत्यक्षात दोन हजारांपेक्षा कमी घरांमधील कचरा उचलला जात असल्याचा आरोप नगरसेवक दासू उर्फ तुकाराम पठारे यांनी केला आहे. ज्या घरांमधून प्रत्यक्ष कचरा संकलित केला जातो, त्याच घरांना स्वच्छता कर आकारावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

या उपोषणाला वैभव गिरमे, पूनम कदम, अनिल चव्हाण, मनीष देठे, दिलीप पठारे, विवेक मुसमाडे, गौरव कदम, अनिल महांकाळ, वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष आबा कदम, भाऊ गुंजाळ आदींनी उपस्थित राहून पाठिंबा दिला. या आरोपांबाबत नगरपरिषद प्रशासन काय भूमिका घेते आणि चौकशी कधी सुरू होते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.